जगप्रसिद्ध नामांकित ब्रँडचे दर्जेदार होम अप्लायंसेस एकाच छता खाली...
● फ्रीज ● ए.सी. ● वॉशिंग मशिन ● एलईडी टीव्ही ● होमथिएटर ● मोबाईल ● होम अप्लायन्सेस
सुलभ हप्त्यावर उपलब्ध 0% फायनान्स
COMPRO Systems & Services
HDB FINANCIAL SERVICES BAJAJ FINSERV
अंबर प्लाझा, एचडीएफसी बँकेजवळ, स्टेशनरोड, अ.नगर. मो. ९३२५१०३०५०
PHILIPS LG Whirlpool SONY SAMSUNG KENSTAR JVC Electrolux

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

TATA TATA MOTORS श्री साई ऑटो सेंटर
टाटा मोटर्स आथोराईज सर्व्हिस स्टेशन
प्लॉट नं. ३७,३८, ओम गार्डन शेजारी, ओम भुईकाटाच्या पाठीमागे, नगर-पुणे रोड, अ.नगर. संपर्क : 9767111651 / 9890111651

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहमदनगर, बुधवार दि. ०३.०७.२०२४ | अंक नं. १०५ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020

आला रे आला राजपाल सेल आला..!
खरेदीवर आकर्षक गिफ्ट
30 ते 70% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
• फ्रेश स्टॉक • आकर्षक गिफ्ट • भरपूर व्हरायटी • भरपूर डिस्काउंट
सावेडी अ.नगर (0241) 2999299
संगमनेर (02425) 222226
नारायणगाव (02132) 242132

# 'तलाठी आणि सेतू कार्यालया'मधून 'लाडक्या बहिणी'ची आर्थिक लूटमार

## रिक्षाचालकांकडूनही अव्वाच्या सव्वा भाडेवसुली, जिल्हा प्रशासनाची मात्र बघ्याची भूमिका




लाडकी बहिण योजनेच्या कागदपत्रांसाठी भिंगार तलाठी कार्यालय आणि कार्यालयाबाहेर महिलांची झालेली गर्दी. (छाया – बबलू शेख)

नगर – शासनाने 'माझी लाडकी बहिण' योजना जाहीर केल्यानंतर या योजनेचा लाभ घेण्यासाठी नागरिकांची सध्या 'धांदल' उडाली आहे. कागदपत्रांसाठी महिला आणि त्यांच्या कुटुंबियांची 'पळापळ' सुरू आहे. याचा गैरफायदा उठवत सेतू, तलाठी कार्यालये, एजंट आणि शेवटी रिक्षाचालकांकडूनही या महिला, नागरिकांची बेसुमार आर्थिक लूट केली जात असल्याचे गंभीर प्रकार घडत आहेत. असे असताना जिल्हा प्रशासनाने मात्र या गंभीर प्रकारांबाबत केवळ बघ्याची भूमिका घेतली आहे.

'मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण' योजनेची १ जुलैपासून राज्यात अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर पहिल्या दोन दिवसात उत्पन्नाचा आणि रहिवाशी दाखला मिळविण्यासाठी लाभार्थ्यांनी तलाठी, सेतू कार्यालयात प्रचंड गर्दी केली. सदरचे दाखले मिळण्यासाठी मोठा अवधी लागणार असल्याने याबाबत वाढलेला दबाव पाहून शासनाने योजनेच्या निकषात काही बदल केले. मात्र सदरचे बदल स्थानिक पातळीवर अद्यापही माहिती झालेले नसल्याने बुधवारी (दि. ३) भिंगार शहरातील तलाठी कार्यालय व सेतू कार्यालयात महिला, नागरिकांनी नेहमीप्रमाणे कागदपत्रांसाठी प्रचंड गर्दी केली आहे. लाभार्थ्यांच्या अज्ञानाचा गैरफायदा घेत सेतू आणि तलाठी कार्यालयाकडून या महिला आणि नागरिकांची प्रचंड आर्थिक लूट केली जात आहे. रहिवाशी दाखला २५० रुपये, उत्पन्नाचा दाखला २५० रुपये, अर्ज भरण्यासाठी ५० रुपये असे अवाजवी शुल्क अकारण्यात येत असून, नागरिकांची मोठी आर्थिक लूट केली जात आहे. त्याचबरोबर या कार्यालयापर्यंत येण्यासाठी रिक्षाचालकांकडूनही लाभार्थी प्रवाशांकडून अव्वाच्या सव्वा भाडे वसूल केले जात आहे. योजनेचा लाभ मिळेल तेव्हा मिळेल, पण आज मात्र नागरिकांना आर्थिक लुटमारीला सामोरे जावे लागत आहे. मनमानी पद्धतीने शुल्क अकारणी करून लाभार्थ्यांकडून पैसे उकळले जात आहेत.

या सर्व गंभीर प्रकाराबाबत जिल्हा प्रशासनाने मात्र बघ्याचीच भूमिका घेतली आहे. योजनेच्या अंमलबजावणीबाबत शासकीय यंत्रणेतच समन्वयाचा अभाव असल्याने लाभार्थी महिलांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे.

### योजनेला ३१ ऑगस्टपर्यंत मुदतवाढ; महिलांनी कार्यालयात गर्दी करु नये

दरम्यान, योजनेची कागदपत्रे सादर करून अर्ज भरण्याची मुदत सरकारने ३१ ऑगस्टपर्यंत वाढविली आहे. त्याचबरोबर उत्पन्नाच्या व रहिवास प्रमाणपत्रासाठी पर्यायी कागदपत्र ग्राह्य धरले जाणार आहे. त्यामुळे महिला, नागरिकांनी दाखल्यांसाठी गर्दी करू नये. विद्यार्थी प्रवेशासाठी लागणाऱ्या दाखल्यासाठी नागरिकांनी यावे, असे आवाहन भिंगार तलाठी कार्यालयाकडून करण्यात आले आहे.

# मनपाच्या आवारात घुमला 'कुत्र्यांचा भोंगा'; बंदोबस्त करा अन्यथा कुत्रे आणून सोडणार

## प्रशासनाने या गंभीर विषयाची तातडीने दखल घेण्यासाठी माजी महापौर अभिषेक कळमकर, माजी नगरसेवक विक्रम राठोड यांनी केले आंदोलन





महापालिकेत भटके कुत्र्यांचा बंदोबस्त करावा, या मागणीचे निवेदन प्रभारी आयुक्त सौरभ जोशी यांना देताना अभिषेक कळमकर, विक्रम राठोड आदी.

नगर – नगर शहरात भटक्या कुत्र्यांचा उच्छाद झाला असून, नगरकरांना अक्षरशा जीव मुठीत धरावा लागत आहे. शहर तसेच उपनगरात अनेक ठिकाणी भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात लहान मुले, मोठी माणसे जखमी झालेली आहे. रात्रीच्या वेळी तर रस्त्यावरून फिरणे ही कठीण झाले आहे. याबाबत वेळोवेळी मनपा कार्यालय येथे निवेदने देण्यात आली आहे. तरीही मनपाकडून भटक्या कुत्र्यांचा सुळसुळाट रोखण्यासाठी पाऊले उचलली नसल्याचे निषेधार्थ आंदोलन करत मनपा अतिरिक्त आयुक्त सौरभ जोशी यांच्यासोबत चर्चा केली. यावेळी माजी महापौर अभिषेक कळमकर, माजी नगरसेवक विक्रम राठोड, नलिनीताई गायकवाड, फारूक रंगरेज, सुदाम भोसले, नामदेव पवार, आसाराम कावरे, सचिन ढवळे, अंबादास बाबर, किरण सपकाळ, श्रावण काळे, फराज पठाण, सचिन नवगिरे, ससाने ताई, हेलन पाटोळे ताई, प्रशांत भाले, गिरीश जाधव, गौरव ढोणे, अनिस शेख, गणेश कळमकर, चैतन्य ससे, अभिषेक जगताप, अक्षय शेटे, राहुल घोरपडे, नितीन खंडागळे, अभिजीत अष्टेकर, गणेश झिंजे, सुनील भोसले, जेम्स अल्हाट, नरेश भालेराव, भीमराज कराळे आदीसह पदाधिकारी उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे की, मनपाकडून भटक्या कुत्र्यांचा सुळसुळाट रोखण्यासाठी कुठलीही कारवाई करण्यात आलेली नाही त्यामुळे नागरिकांचा संयम सुटत चालला आहे. प्रशासनाने सदर गंभीर विषयाची तातडीने दखल घ्यावी अन्यथा मनपाच्या आवारात भटके कुत्रे सोडण्यात येणार असून, शहरात व उपनगरात जवळपास १० ते १२ हजार भटकी कुत्री आहे. रात्रीच्या वेळी रस्त्यावर कुत्र्यांच्या झुंडी पहायला मिळतात अंधारात या झुंडी वाहन चालक पदचाऱ्यांवर हल्ला करतात. कुत्र्यांच्या भीतीमुळे अनेकांचे अपघात झाले आहे, त्यामुळे रात्रीच्या वेळी अघोषितसंचारबंदीसारखी परिस्थिती निर्माण होते. मनपा प्रशासनाकडून कुत्रे पकडणे आणि निर्बिजीकरणकरण्यासाठी खाजगी संस्था नियुक्त केल्याचे सांगितले जाते. प्रत्यक्ष या संस्थेचे असे कोणतेही काम दिसून येत नाही, त्यामुळे नगरकरांचा त्रास वाढत चालला आहे. सध्या शाळा, कॉलेज सुरू झाले आहे, विद्यार्थी पायी किंवा सायकलने शाळेत ये-जा करतात. त्यांनाही भटक्या कुत्र्यांचा उपद्रव सहन करावा लागत आहे. मनपा प्रशासनाने या समस्येचे निराकरण करण्यासाठी ठोस कारवाई करावी अन्यथा अहमदनगर महानपालिकेमध्ये कुत्रे सोडून आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा अभिषेक कळमकर व विक्रम राठोड यांनी दिला आहे.

अप्रतिम सुगंध पुजेत आणील मनप्रसन्नता, एकाग्रता व शांती
निळकंठ प्रिमीयम प्रोडक्ट अगरबत्ती
केवल अगरबत्ती
आजच सर्व दुकानात मागणी करा
आडते बाजार, रसरंग मिसळ समोर, अ.नगर. तालुकावार वितरक नेमणे आहे

CHEST CARE CLINIC
डॉ.निखिल अरुण चिल्लाळ
MBBS, TDD, DNB, EDARM
Chest Physician & Interventional Pulmonologist
श्वसन व फुफ्फूस रोग तज्ञ
आता प्रत्येक शुक्रवारी नगरमध्ये...
* जुनाट खोकला, सर्दी, धाप
* छातीमध्ये घर घर होणे, कफ येणे
* दमा, बाल दमा
* ॲलर्जी
* शिंका येणे
* निमोनिया
* टीबी
* छातीत पाणी, पू भरणे
* खोकल्यात रक्त येणे
* प्रौढांचे लसीकरण
* फुफ्फुसांचा कॅन्सर
* प्रतिकार शक्तीचे आजार
* धुम्रपान मुक्ती
* फुफ्फुसांचे जाळीकरण
* धूर व धुळीमुळे होणारे श्वसनाचे विकार
* फुफ्फूस, अवदान व इतर अवयवांचे
* क्षयरोग (टीबी)
* घोरणे व झोपेत श्वास कोंडण्याची समस्या
* कोविड व कोविडनंतर झालेले फुफ्फुसांचे आजार
* इतर फुफ्फुसांच्या आजारांवर तज्ञांचा सल्ला व उपचार
उपलब्ध सुविधा
* संगणकाद्वारे फुफ्फुसांच्या कार्यक्षमता व गुणधर्माची तपासणी
* दुर्बिणीद्वारे फुफ्फुसाची तपासणी
* छातीची शस्त्रक्रिया
* झोपेची तपासणी
अपॉईंटमेंटसाठी संपर्क : 9359260250
मुथ्था चेंबर्स, चंगेडिया मेडिकल शेजारी, माळीवाडा, अ.नगर (प्रत्येक शुक्रवारी)

# पोलीस अधिकाऱ्यांसाठीचा ट्युनिक गणवेश बंद; गृह विभागाचे आदेश

मुंबई – महाराष्ट्रातील भौगोलिक परिस्थितीचा विचार करता ट्युनिक गणवेश वापरणे अडचणीचे व आर्थिकदृष्ट्या खर्चिक असल्याचा अभिप्राय घटक प्रमुखांकडून प्राप्त झाला आहे. यापार्श्वभूमीवर महाराष्ट्र पोलीस दलाचे प्रमुख पोलीस महासंचालक यांनी केलेल्या शिफारशीनुसार राज्याच्या गृह विभागाने मंगळवारी (दि.२) याबाबतचे नवीन आदेश काढले आहेत. या आदेशानुसार पोलीस उपअधीक्षक ते पोलीस उपनिरीक्षक या दर्जाच्या अधिकाऱ्यांना ट्युनिक गणवेश परिधान करणे बंद करण्यात आले आहे.

गृह विभागाचे अवर सचिव सुधाकर यादव यांनी निर्गमित केलेल्या आदेशात म्हटले आहे की, महाराष्ट्र पोलीस नियमावली ७ मधील २११ ते २१३ नुसार पोलिस उप अधीक्षक ते पोलीस उपनिरीक्षक या दर्जाच्या अधिकाऱ्यांसाठी असलेला ट्युनिक गणवेश परिधान करणे बंद करण्यात आले आहे.

महाराष्ट्र राज्य पोलीस दलातील पोलीस अधिकारी यांनी समारंभ, परेड, ध्वजवंदना दरम्यान दररोजच्या कामासाठी घालण्यात येणाऱ्या गणवेशावर (वर्कींग पोषाख) क्रॉस बेल्ट व तलवार धारण करावी, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

### पोलिसांचा ट्युनिक गणवेश कसा असतो ?

खाकी रंगाचा फुल भायाचा ब्लेझर, त्याच्या आतून अंगात अगोदर फुल भायाचा खाकी शर्ट, गळ्यात टाय किंवा स्कार्फ, ब्ल्यू कॅप असा ट्युनिक गणवेश असतो. तो वापरणे अडचणीचे ठरत होते. त्यातून आता पोलिस अधिकाऱ्यांची सुटका झाली आहे.

Back to SCHOOL
10% off For All Stationary Item
* बर्थडे साठी लागणारे विविध प्रकारचे गिफ्ट पॅक करुन मिळतील.
आर एन आर्ट ॲण्ड क्राफ्ट
गिफ्ट ॲण्ड स्कुल स्टेशनरी
होलसेल & रीटेलर
मो. ९३२५३२९०६१ / ९३७३४१७११३
काका खवावाला समोर, नेता सुभाष चौक, चितळे रोड, अ.नगर ४१४ ००१

SONI TILES Since 1965 AND MARBLE INDUSTRIES
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स ॲण्ड मार्बल इंडस्ट्रिज
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## माझे जग आणि इतर जग...

एकदा श्रीगणेश व कार्तिकेय यांची जगप्रदक्षिणेची शर्यत लागली होती. अधिक चपळ असलेल्या कार्तिकेयाने आपल्या मोर या वाहनावर बसून समुद्र, तारे, खंड यात उडत भ्रमंती सुरू केली. गणपतीने मात्र आपल्या आई-वडिलांभोवती ३ प्रदक्षिणा घालत आपण जिंकल्याचे पाहिले. याचे कारण विचारल्यावर तो म्हणाला, ''मी माझ्या जगाभोवती प्रदक्षिणा घातल्या. तू तुझ्या. मग महत्त्व कशाला?''

तात्पर्य 'जग' ही कल्पना सापेक्ष आहे. माणसाच्या कल्पनेतील सत्य हे स्वतंत्र असते. जगातील वेगवेगळ्या लोकांचे जग वेगवेगळे व आपापले असतात.

लहानपणी ऐकलेली एक गोष्ट येथे प्रकर्षाने आठवते. ५-६ प्रकारची दिव्यांग माणसं आपापल्या जाणिवेने हत्ती कसा आहे ते सांगतात. त्यांच्या त्यांच्या अनुभव, संवेदन क्षमतेप्रमाणे ते ते अनुभूती घेतात. विविध जात, पंथ, धर्माचीही जग व जगाविषयी धोरणा व संकल्पना आपापली आहेत. कुणाला सत्ता, पैसा, प्रसिद्धी हीच दुनिया वाटेल तर भारतीय तत्त्वज्ञानाला मानणाऱ्यांना जग हे शुल्लक, क्षणभंगुर वाटेल.

जग जिंकायला निघालेल्या अलेक्झांडरला 'दुनिया मुठ्ठीत' करायची होती तर सर्वसंगपरित्याग करणाऱ्या साधुसंतांना, विशेषतः जैन संतांना भौतिकता सोडून 'न अस्तित्व' हेच जग वाटते.

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन
संकलन : "मुसाफिर"-९८२२०२०६९१



# नगर शहर विधानसभा मतदारसंघ राष्ट्रवादीकडेच

### कर्जत, जामखेड, राहुरी, पारनेर, कोपरगाव, श्रीरामपूर, अकोला व श्रीगोंद्यावरही दावा; अजित पवार गटाची विधानसभा निवडणूक जिल्हा आढावा बैठक

नगर - आगामी विधानसभा निवडणुकांसाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली नगर दक्षिण जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीने तयारी सुरु केली आहे. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष खा.सुनील तटकरे यांच्या आदेशानुसार १५ जुलै पर्यंत दक्षिण भागातील सर्व तालुका पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करून संघटन मजबूत करत आहोत. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या सारखे धडाडीचे नेतृत्व पक्षाल लाभले आहे. भविष्यात त्यांचे हात अधिक बळकट करण्यासाठी नगर जिल्ह्यातून जास्तीत जास्त आमदार कसे निवडून येतील याचे नियोजन करा. नगर शहर राष्ट्रवादीकडे आहेच याशिवाय कर्जत जामखेड, राहुरी, पारनेर, कोपरगाव, श्रीरामपूर, अकोला व श्रीगोंदा मतदार संघांची मागणी पक्षाकडे करत आहे. विधानसभा निवडणुकीसाठी सर्व पदाधिकाऱ्यांनी सज्ज होऊन आपापल्या भागाचा अहवाल पक्षाकडे लवकरात लवकर सादर करावा, असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटाचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब नाहाटा यांनी केले.



नगर दक्षिण राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटाच्या आढावा बैठकीत बोलताना जिल्हाध्यक्ष बाळासाहेब नाहाटा. समवेत प्रदेश उपाध्यक्ष राजेंद्र नागवडे व राजेंद्र गुंड, नंदकुमार मुंडे, अजित कदम, सुषमा रावडे आदी पदाधिकारी.

आगामी विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर नगर दक्षिण राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटाच्या जिल्हा पदाधिकारी व तालुकाध्यक्षांची आढावा बैठक जिल्हाध्यक्ष बाळासाहेब नाहाटा यांच्या मार्गदर्शनाखाली नगरमध्ये झाली. यावेळी पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष राजेंद्र नागवडे व राजेंद्र गुंड, राज्य पणन महामंडळाचे अध्यक्ष दत्ता पानसरे, ज्येष्ठनेते बाळासाहेब जगताप, जिल्हा युवक अध्यक्ष नंदकुमार मुंडे, अजित कदम, पारनेर महिला आघाडीच्या तालुकाध्यक्षा सुषमा रावडे आदी पदाधिकाऱ्यांसह सर्व तालुकाध्यक्ष उपस्थित होते. यावेळी विधानसभा निवडणूकीत पक्षाच्या जास्तीत जास्त जागा निवडून आणण्याचा संकल्प करण्यात आला. यावेळी नव्या पदाधिकाऱ्यांना व तालुकाध्यक्षांना नियुक्ती पत्रे देण्यात आली.

बाळासाहेब नाहाटा पुढे म्हणाले, सर्वसामान्य नागरिक व महिलांसाठी अर्थमंत्री या नात्याने उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी लाभदायक योजना सुरु केल्या आहेत. या योजनांचा लाभ सर्व समाजातील शेवटच्या स्तरापर्यंत जाण्यासाठी सर्व पदाधिकाऱ्यांनी योगदान द्यावे. नव्याने आलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेचा प्रचार व प्रसिद्धी करून त्याचा लाभ सर्व माता भगिनींना मिळवून द्या. महायुतीमधील घटक पक्षांच्या पदाधिकाऱ्यांशी मनोमीलन करून बरोबर काम करावे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर इतर महायुतीतील व इतर पक्षामधील नेते टीका करत आहेत. ती टीका त्यांनी त्वरित थांबवावी.

यावेळी राजेंद्र नागवडे म्हणाले, लोकसभा निवडणुकीत मोठ्याप्रमाणात जातीय विष पेरले गेले आहे. हा जातीय वाद न थांबल्यास याचा दूरगामी परिणाम होतील. विधानसभा निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीने जास्तीत जास्त जागांची मागणी महायुतीत लावून धरावी. लोकसभा निवडणुकीत त्यामानाने पक्षाला कमी जागा मिळाल्या होत्या. अजित पवारांसारखा खमक्या नेता आपल्याकडे असल्याचा अभिमान बाळगून त्यांचे हात बळकट करा.

बाळासाहेब जगताप म्हणाले, जिल्ह्यातील प्रत्येक मतदार संघात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची ताकद आहे. येणाऱ्या काळत अनेक मातब्बर नेते मंडळी पक्षात येणार असल्याने ही ताकद अजून वाढणार आहे.

आढावा बैठकीस जिल्हा वैद्यकीय मदत कक्ष अध्यक्ष साईनाथ भगत, श्रीगोंदा तालुकाध्यक्ष सुभाष शिंदे, कर्जत तालुकाध्यक्ष बाळासाहेब शिंदे, पारनेर तालुकाध्यक्ष विक्रम कळमकर, दिलीप जठार जामखेड तालुकाध्यक्ष महेश निमोणकर, नगर तालुकाध्यक्ष अशोक कोकाटे, पाथर्डी तालुकाध्यक्ष रणजित बेळगे, जिल्हा उपाध्यक्ष बापूसाहेब शिंदे, पाथर्डी शहराध्यक्ष धन्यकुमार गुगळे, कार्याध्यक्ष फारुख शेख, जिल्हा सरचिटणीस शौकत सय्यद, राहुरी शहराध्यक्ष सुनील भट्टड, सरचिटणीस नंदकुमार गागरे, देवराम घोगरे सुरज रसाळ आदी उपस्थित होते.



जॉईन्ट फोरम ऑफ बीएसएनएल व एमटीएनएल पेन्शनर्स असोसिएशनच्या संयुक्त विद्यमाने शहरातील बीएसएनएलच्या मुख्य कार्यालयासमोर सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी निदर्शने केली.

# पेन्शन रिव्हिजनच्या मागणीसाठी बीएसएनएल कर्मचाऱ्यांची निदर्शने

नगर - पेन्शन रिव्हिजन मागणी दिवसानिमित्त मंगळवारी (दि.२ जुलै) जॉईन्ट फोरम ऑफ बीएसएनएल व एमटीएनएल पेन्शनर्स असोसिएशनच्या संयुक्त विद्यमाने शहरातील बीएसएनएलच्या मुख्य कार्यालयासमोर सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी निदर्शने केली. पेन्शन रिव्हिजनसह विविध मागण्यांसाठी जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.

या आंदोलनात आप्पासाहेब गागरे, आप्पासाहेब गागरे, शिवाजी थोरात, दत्तात्रय भालेराव, भानुदास महानूर, सुधाकर पवार, दत्तात्रय भोर, विलास कोकरे, लालाजी शेख, शिवाजी मोढवे, राजू कोकरे आदींसह जिल्ह्यातील बीएसएनएल कर्मचारी व संघटनेचे पदाधिकारी सहभागी झाले होते.

प्रारंभी द्वार सभा होऊन प्रमुख पदाधिकाऱ्यांनी आपल्या भाषणात कर्मचाऱ्यांचे विविध प्रश्न मांडले. पेन्शन रिव्हिजन १ जानेवारी २०१७ पासून मिळण्याची प्रमुख मागणी आंदोलकांनी केली. भारत सरकारने हा प्रलंबित विषय लवकरात लवकर सोडवण्याची भावना बीएसएनएल कर्मचाऱ्यांच्या वतीने व्यक्त करण्यात आली आहे. या मागणीचे निवेदन अहमदनगर बीएसएनएलच्या मुख्यालयात जनरल मॅनेजर यांना देण्यात आले.

# राजर्षी शाहू महाराज जयंती पर्वात ९०२ विद्यार्थ्यांना जातवैधता प्रमाणपत्राचे वाटप

नगर - राजर्षी शाहू महाराजांचा जन्मदिवस २६ जून निमित्त आयोजित जयंती पर्वात ९०२ जात वैधता प्रकरणे निकाली काढण्यात आली. अहमदनगर जिल्हा जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या वतीने त्रुटी पूर्तता शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात जात वैधता प्रमाणपत्रांची ही प्रकरणे निकाली काढण्यात आली.

महाराष्ट्र शासनाच्या वतीने दरवर्षी २६ जून हा सामाजिक न्याय दिन म्हणून साजरा केला जातो. २६ जून २०२४ ते २ जुलै २०२४ या कालावधीत राजर्षी शाहू महाराज जयंती पर्व साजरा करण्याच्या शासनाच्या सूचना आहेत.

राजर्षी शाहू महाराज जयंती पर्व कालावधीत समितीने त्रुटी पूर्तता कॅम्प आयोजित केला. त्यामध्ये ४३८ विद्यार्थी-पालकांनी सहभाग नोंदविला. त्यापैकी २५० विद्यार्थ्यांनी त्रुटी पूर्तता करून त्यांना वैधता प्रमाणपत्र निर्गमित करण्यात आले आहे. तसेच सदर कालावधीत नियमित प्राप्त होणाऱ्या प्रकरणांची छाननी करून समितीने जयंती पर्वाचे औचित्य साधून ६५२ विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र त्यांच्या ई-मेलवर पाठवले आहेत. असे जिल्हा जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी समितीने कळविले आहे.

## शिष्यवृत्ती परीक्षेत आरुष सुरसेचे यश



नगर - इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती परीक्षा २०२४ मध्ये श्री महादजी शिंदे विद्यालय (ता. श्रीगोंदा) येथील विद्यार्थी आरुष महेंद्र सुरसे याने २१४ गुण मिळवून जिल्हा गुणवत्ता यादीमध्ये (शहरी विभाग) क्रमांक मिळविला आहे. त्यास डोईफोडे ए. एन. यांचे मार्गदर्शन लाभले. महेंद्र एकनाथ सुरसे, सागर एकनाथ सुरसे व नागेश्वर टेलर्स केडगाव, एकनाथ व मिनिनाथ सुरसे यांनी त्याचे कौतुक केले आहे.

# हॉटेलच्या व्यवस्थापकाला दमदाटी करत धमकावले

### सचिन कोतकरसह ७ जणांच्या विरुद्ध पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

नगर - सक्कर चौकातील यश पॅलेस हॉटेलच्या व्यवस्थापकाला शिवीगाळ करुन तू यश पॅलेस येथे काम करु नकोस, तू येथून कोठेही जा, अशी दमदाटी केल्याची व तुला जिवंत ठेवणार नाही, अशी धमकी दिल्याची घटना सोमवारी (दि.१)मध्यरात्री एक वाजण्याच्या सुमारास घडली. या प्रकरणी सचिन कोतकर यांच्यासह ७ जणांवर कोतवाली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत राकेशकुमार रामनारायण सिंग (वय ४५, रा. नंदकिशोर रेसिडेन्सी, वडगाव गुप्ता रोड, नागापूर) यांनी फिर्याद दिली आहे. सिंग हे २०२० पर्यंत उदयनराजे पॅलेस येथे व्यवस्थापक म्हणून नोकरी करत होतो. सन २०२१ मध्ये ते यश पॅलेस येथे नोकरीस लागले. तेव्हापासून ते तेथे व्यवस्थापक म्हणून कार्यरत आहेत. सोमवारी (दि.१) मध्यरात्री उदयनराजे पॅलेस येथील प्रिन्स कुमार सिंग याने फोन केला व शिवीगाळ केली.

त्यानंतर घरी जात असतांना सचिन कोतकर यांच्या सांगण्यावरून रोशनकुमार मिश्रा उर्फ राजन कुमार, प्रिन्स कुमार सिंग, निरज कुमार, अमन श्रीकांत सिंग, सुनिल कुमार सिंग, हनुमान रामदास झरेकर यांनी दमदाटी करत तुला नगरमध्ये राहू देणार नाही, तुला जिवंत ठेवणार नाही अशी धमकी दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. या फिर्यादीवरून पोलिसांनी ७ जणांच्या विरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३५१ (२) (३), ३५२, १८९ (२), १९०, १९१ (२) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. अधिक तपास पोलिस करत आहेत.

### हॉटेलच्या वेटरला धमकावल्या प्रकरणी प्रा.शशिकांत गाडेंसह चौघांवर गुन्हा दाखल

दरम्यान हॉटेल उदयनराजे पॅलेसच्या वेटरला धमकावल्याप्रकरणी शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हा प्रमुख प्रा.शशिकांत गाडे यांच्या सह चौघांवर कोतवाली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत प्रिन्सकुमार हरीनारायण सिंग याने फिर्याद दिली आहे. त्यात म्हंटले आहे की, आपण यापूर्वी यश पॅलेस हॉटेल मध्ये वेटर म्हणून काम करत होतो. परंतु ६ महिन्यापूर्वी आपण ते काम सोडले असून सध्या हॉटेल उदयनराजे पॅलेस मध्ये काम करत आहोत. याचा राग मनात धरून हॉटेल यश पॅलेसचा व्यवस्थापक राकेश सिंग याने मोबाईल वर फोन करून तू उदयनराजे हॉटेलवर कामाला का गेला, असे म्हणत शिवीगाळ केली. तसेच पुन्हा वारंवार फोन करून शिवीगाळ व दमदाटी केली. तसेच त्याच फोन वरून शशिकांत गाडे, रमाकांत गाडे, युवराज गाडे यांनीही शिवीगाळ करत तू नगर सोडून जा अशी धमकी दिली असल्याचे फिर्यादीत म्हंटले आहे. या फिर्यादीवरून पोलिसांनी चौघांच्या विरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३५१ (२), ३५२ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

# हॉटेल मालकावर टोळक्याकडून कोयता, तलवारीने हल्ला

### हल्ल्याची घटना हॉटेलच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात झाली कैद

नगर - पारनेर तालुक्यातील निघोज-वडगाव रस्त्यावर असलेल्या हॉटेल जत्राच्या मालकावर एका टोळक्याकडून जेवणाच्या वादातून दारूच्या नशेत कोयता, तलवारीनं हल्ला करण्यात आला आहे. या हल्लूयात हॉटेलचे मालक प्रविण भाऊ भुकन यांच्यासह हॉटेलमधील कर्मचारीही गंभीर जखमी झाले आहेत. मंगळवारी (दि.२) रात्री ११.४० वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. दरम्यान, ही घटना हॉटेलच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे.

या हल्ल्यात जखमी झालेले गणेश भाऊ भुकन यांनी नगर मधील रुग्णालयात उपचार घेत असताना पारनेर पोलिसांना जबाब दिला आहे. या मध्ये त्यांनी म्हंटले आहे की, मंगळवारी (दि.२) रात्री ११.४० वाजण्याच्या सुमारास निघोज येथील माझे मालकीचे जत्रा हॉटेल येथे जेवणाचे कारणावरुन वाद घालुन आदिनाथ मच्छिद्र पठारे, विशाल खंडु पठारे, शंकर केरु पठारे (सर्व रा. पठारवाडी, ता. पारनेर), धोंड्या उर्फ धोंडीभाऊ महादु जाधव (रा. निघोज कुंड ता. पारनेर), सोन्या उर्फ प्रथमेश विजय सोनवणे (रा. निघोज ता. पारनेर) असे एकत्र जमुन, अनाधिकाराने हॉटेल मध्ये काउंटर जवळ आले.

तेथे आल्यावर म्हणाले की, हे माजले आहेत यांना मारुन टाका, यांनी चुकीचे लोकांबरोबर पंगा घेतला असे म्हणुन, त्याचे हातातील कोयता, तलवार, पाईप व काठीने मला, तसेच माझा भाऊ- प्रविण भाऊ भुकन, भाचा ओंकार अकुंश रसाळ व हॉटेल मधील कामगार अजय व सुजान, अशांना शिवीगाळ दमदाटी करुन जिवे मारण्याचे उद्देशाने वार करुन, जबर मारहाण करुन गंभीर दुखापत केली.

काऊंटर व त्यावरील काच तसेच त्या वरील लॅपटॉप व लॅपटॉपची वायर, तसेच भिंतीवर असलेला एल.ए.डी टिव्ही फोडुन अंदाजे १ लाख रुपयांचे नकसान करुन शंकर पठारे याने प्रिंटर उचलून चोरुन घेवून सर्व त्यांचे कडील वाहनाने निघुन गेले असे गणेश भुकन यांनी आपल्या जबाबात म्हंटले आहे.

या जबाबा वरुन पोलिसांनी बुधवारी (दि.३) दुपारी पाचही आरोपींच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# शेअर बाजाराच्या दोन्ही निर्देशांकांचा पुन्हा उच्चांक

### बीएसई सेन्सेक्सने प्रथमच ८० हजारांचा टप्पा केला पार

मुंबई - भारतीय शेअर बाजाराच्या दोन्ही प्रमुख निर्देशांकांनी बुधवारी (दि.३) बाजाराच्या सुरुवातीला पुन्हा सर्वकालीन उच्चांकावर भरारी घेतली. मंगळवारी शेअर मार्केटने नवीन विक्रम नोंदवला तर जून महिन्यापासूनच देशांतर्गत मार्केट रेकॉर्डवर रेकॉर्ड करत आहे. बुधवारी सेन्सेक्स आणि निफ्टीने पुन्हा जुने रेकॉर्ड मोडत नव्या विक्रमांच्या दिशेने उघडले. बाजारातील या तेजीचा कंपन्यांसह गुंतवणूकदारांना मोठा फायदा होत आहे. दुसरीकडे, बाजारातील तेजीच्या जोरावर देशातील सर्वात मोठी खासगी कर्ज देणाऱ्या एचडीएफसी बँकेच्या शेअर्सनी नवीन उच्चांकावर भरारी घेतली. महत्त्वाच्या जागतिक निर्देशांकातील वेटेज वाढण्याच्या अपेक्षेने एचडीएफसी बँकेच्या समभागांनी विक्रमी पातळी गाठली.

एक दिवस आधी देशांतर्गत बाजारात थोडीशी घसरण झाली होती, मात्र बुधवारी व्यवसाय मजबूतीची चिन्हे दिसत आहेत. मजबूत जागतिक पाठिंब्यामुळे देशांतर्गत शेअर बाजाराने बुधवारी नवा इतिहास रचला. बुधवारी, व्यवहार सुरू होताच बीएसई सेन्सेक्सने ५७० हून अधिक अंकांची उसळी घेतली आणि प्रथमच ८० हजारांचा टप्पा पार केला. व्यवहाराच्या सुरुवातीच्या काही मिनिटांत बाजाराची गती थोडी मंदावली मात्र त्याआधी सेन्सेक्सने ऑल-टाइम उच्चांकावर झेप घेतली होती. बाजारातील तेजीला लगाम लागण्यापूर्वी सेन्सेक्सने ८०,०३९.२२ अंकांच्या नवीन शिखर तर निफ्टीने २३,२९१.७५ अंकांच्या नव्या शिखरावर मुसंडी मारली. सकाळी ९.२० वाजता सेन्सेक्स ३५८.४४ अंकांच्या वाढीसह ७९,८०० अंकांजवळ व्यवहार करत होता तर निफ्टी १०७.८० अंक वाढून २३,२३२ अंकांच्या आसपास राहिला.

शेअर मार्केट ओपनिंगच्या प्री-ओपन सत्रात बीएसई सेन्सेक्सने ७५० हून अधिक अंकांनी उडी मारून ८० हजारांचा टप्पा ओलांडला आणि ८०,२०० अंकांच्या जवळ पोहोचला, तर निफ्टी १७० अंक वाढीसह २४,३०० अंकांजवळ उसळला. त्याचवेळी, बाजारातील व्यवहार सुरू होण्यापूर्वीच गिफ्ट सिटीमधील निफ्टी फ्यूचर सुमारे १४० अंक वाढीसह २४,३४० अंकांजवळ होता. तर बाजार सकारात्मक सुरुवातीसही नवीन विक्रम रचेल, असे संकेत मिळत होते.

सुरुवातीच्या सत्रात बँकिंग स्टॉकमध्ये जोरदार तेजी दिसून आली तर सेन्सेक्समध्ये सूचिबद्ध कळ्रऊ बँकेच्या शेअरमध्ये सर्वाधिक ३% वाढ नोंदवली गेली. तसेच कोटक महिंद्रा बँकेचा शेअरही १ टक्क्यांहून अधिक तेजीत दिसून आला असून बजाज फायनान्स, आयसीआयसीआय बँक, बजाज फिनसर्व्ह, इंडसइंड बँक, एसबीआय यांसारखे शेअर्स ग्रीन झोनमध्ये दिसत आहेत. दुसरीकडे, सन फार्मा सर्वाधिक ०.६०% घसरला तर टीसीएस, टेक महिंद्रा, इन्फोसिस सारखे आयटी समभागही सुरुवातीच्या व्यवहारात घसरले.

# खा.निलेश लंके यांचे ५ जुलैला कांदा, दूध प्रश्नावर 'आंदोलन'

### जिल्हाधिकारी कार्यालयासमोर महाविकास आघाडी करणार जनआक्रोश



नगर -निर्यातबंदीमुळे कांद्याचे कोसळलेले भाव तसेच दुधाच्या दरात झालेल्या कपातीच्या निषेधार्थ खासदार निलेश लंके यांच्या नेतृत्वाखाली महाविकास आघाडीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शुक्रवारी (दि.५) शेतकरी जनआक्रोश आंदोलन करण्यात येणार आहे. सकाळी १० वाजता या आंदोलनास सुरूवात होणार असून या आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन महाविकास आघाडीच्या वतीने करण्यात आले आहे.

या आंदोलनासंदर्भात खा. लंके यांनी जिल्हाधिकारी सिध्दाराम सालीमठ यांना निवेदन सादर केले असून त्यात नमुद करण्यात आले आहे की, राज्यातील कांदा व दुध उत्पादक शेतकरी योग्य भाव न मिळाल्यामुळे आर्थिक संकटात सापडला आहे. दुधाचे भाव गेली वर्षभर सातत्याने कोसळत आहेत. सध्या दुधाला मिळणाऱ्या भावामध्ये दुध उत्पादक शेतकऱ्यांचा उत्पादन खर्चही त्यातून निघत नसल्याने राज्यातील शेतकरी मेताकुटीला आलेला आहे. सरकारने दुधाला अनुदान देण्याची घोषणा केली खरी परंतू अनुदानाच्या जाचक अटी व शर्तींमुळे शेतकऱ्यांना त्याचा लाभ होत नाही. नुकतीच केंद्र सरकारने दहा हजार टन दुध पावडर आयात करण्याचा निर्णय घेतला आहे. विशेष म्हणजे ही आयात करमुक्त असल्यामुळे दुध उत्पादकांना त्याचा मोठा फटका बसणार आहे.

निवेदनात पुढे म्हटले आहे की, केंद्र व राज्य सरकारच्या धोरणांमुळे शेती तोटयात जाऊ लागली आहे. वाढलेली महागाई, नैसर्गिक आपत्ती, खतांचे वाढलेले दर, सरकारचे शेतीमालासंदर्भातील चुकीचे धोरण, रासायनिक खते, बी-बियाणे, किटकनाशके, शेती औजारे यांच्या माध्यमातून जी. एस.टी. चा शेतकऱ्यांवर बोजा पडलेला आहे. मात्र देशभरातील जनतेला अन्नधान्य पुरविणाऱ्या शेतकऱ्यांच्या डोक्यावरील कर्जाचा डोंगर सरकारला दिसत नाही. यातून शेतकऱ्यांना बाहेर काढण्यासाठी सरकारने संपूर्ण कर्जमाफीसह तात्काळ विविध उपाययोजना करणे आवष्यक आहे.

राज्यातील शेतकऱ्यांमध्ये दुध आणि शेतीमालाच्या हमी भावावरूनप प्रचंड असंतोष आहे. यासाठी अनेक शेतकरी संघटना विविध आंदोलने करीत आहेत. शेतकऱ्यांच्या दुधाला ४० रूपये दर मिळावा, शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी, कांदा व इतर शेतीमालाला योग्य हमीभाव मिळावा या मागणीसाठी हजारो शेतकरी, दुध उत्पादक तसेच विविध शेतकरी संघटनांसह ५ जुलै रोजी सकाळी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्यात येणार असल्याचे खा. लंके यांच्या निवेदनात नमुद करण्यात आले आहे.

## इंद्रायणी वाणी यांचे १०१ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन



श्रीरामपूर - येथील इंद्रायणी शंकर वाणी (वय १०१) यांचे वृध्दापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा सून नातू असा परिवार आहे. मातुलठाण येथील प्रगतशील शेतकरी दिपक एकनाथ वाणी तसेच भाजपाचे माजी जिल्हा सरचिटणीस व माजी तालुकाध्यक्ष सुनिल एकनाथ वाणी यांच्या आजी होत.

## सुभद्राबाई घोलप यांचे वृद्धापकाळाने निधन



केडगाव - येथील सुभद्राबाई गेणू घोलप (वय ९३) यांचे २ जुलै रोजी सायंकाळी ४:३० वाजता वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात ३ मुले, ३ सुना, १ मुलगी, ११ नातवंडे २ नातसुना असा परिवार आहे.

## शांताराम बागुल यांचे वृद्धापकाळाने निधन



श्रीरामपूर - श्रीरामपूर एमआयडीसी येथील जनार्दन पेपर इंडस्ट्रिज प्रा.लि.चे मालक शांताराम रामभाऊ बागुल (वय ९३) यांचे वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन भाऊ, पाच मुले, सुना, पुतणे, नातवंडे असा परिवार आहे.

पंडीतराव बागुल व सुरेशराव बागुल यांचे थोरले बंधू, अरुण, विजय, रविंद्र, सचिन व नितीन बागुल यांचे वडील होत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहमदनगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# प्रमाणपत्र मिळण्यासाठी बांधकाम कामगारांचे जिल्हा परिषदेच्या आवारात 'धरणे आंदोलन'

### प्रमाणपत्र देण्यास टाळाटाळ करणाऱ्या ग्रामसेवकांवर कारवाई करण्याची मागणी



प्रमाणपत्र मिळण्यासाठी जिल्हा परिषदेत धरणे आंदोलन करताना बांधकाम कामगार.

नगर – आदेश देऊनही बांधकाम कामगारांना ग्रामसेवकांकडून प्रमाणपत्र दिले जात नसल्याच्या निषेधार्थ अहमदनगर जिल्हा इमारत व इतर बांधकाम कामगार संघटनेच्या वतीने मंगळवारी (दि.२ जुलै) जिल्हा परिषदेत धरणे आंदोलन करण्यात आले. प्रमाणपत्र मिळण्यासाठी बांधकाम कामगारांनी दिलेल्या घोषणांनी जिल्हा परिषदेचा परिसर दणाणून निघाला.

बांधकाम कामगार संघटनेचे सरचिटणीस नंदू डहाणे, क्रांती असंघटीत कामगार संघटनेच्या अध्यक्षा अनिता कोंडा, समर्पण फाऊंडेशनचे डॉ. किरण घुले व विश्वकर्मा बांधकाम कामगार संघटनेचे श्रीराम परदेशी यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात जिल्ह्यातील बांधकाम कामगार सहभागी झाले होते. बांधकाम कामगारांच्या नोंदणीचे नूतनीकरण होण्यासाठी ९० दिवसाचे प्रमाणपत्र मिळत नसल्याने ग्रामसेवकांच्या आडमुठेपणामुळे बांधकाम कामगारांना शासकीय योजनांपासून वंचित राहण्याची वेळ आली असल्याचा आरोप करुन त्यांच्यावर कारवाईची मागणी करण्यात आली.

बांधकाम कामगारांना काही गावांचे ग्रामसेवक प्रमाणपत्र देत नाही. ग्रामसेवक संघटनेच्या पत्रावर शासनाचे मार्गदर्शन येईपर्यंत प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही चालू ठेवावी, असे स्पष्ट आदेश जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिले आहे. तरी देखील काही ग्रामसेवक बांधकाम कामगारांना ९० दिवसाचे प्रमाणपत्र देण्याचे नाकारत आहे. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिलेल्या आदेशाला धुडकावण्यात आले आहे. नगर तालुक्यातील नारायण डोह, चास, बुऱ्हाणनगर, मेहेकरी, निंबळक, नेवासा तालुक्यातील राहुरी ब्राह्मणी, आरडगाव, राहुरी खुर्द, केंदळ, अकोले तालुक्यातील अभोल, कोतुळ, मवेशी, राजुर, पाथर्डी तालुक्यातील अंबिकानगर, टाकळीमानुर, तीनखडी येथील ग्रामपंचायतीत ग्रामसेवक प्रमाणपत्र देत नाही. बांधकाम कामगारांना प्रमाणपत्र नाकारणाऱ्या ग्रामसेवकांची प्रत्येक तालुकास्तरावर यादी करुन त्यांच्यावर कार्यवाही करण्याचे निवेदनात म्हंटले आहे.

डॉ. किरण घुले म्हणाले की, नोंदणीकृत बांधकाम कामगारांचे नूतनीकरण करण्यासाठी बांधकाम कामगारांना ९० दिवस काम केल्याचे प्रमाणपत्र देण्याचे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी ग्रामसेवकांना आदेश दिले आहे. मात्र ग्रामसेवकांकडून बांधकाम कामगारांना अन्यायकारक वागणूक देऊन त्यांना प्रमाणपत्र देण्यास टाळाटाळ केली जात आहे. महाराष्ट्र कल्याणकारी मंडळाच्या वतीने बांधकाम कामगारांचा विमा काढणे, त्यांच्या मुलांना शिष्यवृत्ती देणे आदी कल्याणकारी योजनांचा लाभ मिळण्यासाठी त्यांची नोंदणीचे नूतनीकरण होणे आवश्यक आहे. यासाठी त्यांना ९० दिवसाच्या प्रमाणपत्राची गरज भासत आहे. मात्र ग्रामसेवकांच्या आडमुठेपणामुळे त्यांची नोंदणी रखडली असून, शासकीय योजनांपासून ते वंचित झाले आहेत.

अनिता कोंडा म्हणाल्या की, बांधकाम कामगारांना प्रमाणपत्र देताना घरपट्टी, पाणीपट्टी भरली की नाही? हे विचारण्याचा व त्यांना अडविण्याचा त्यांना अधिकार नाही. ग्रामसेवकांनी बांधकाम कामगारांना ९० दिवसाचे काम केल्याचे प्रमाणपत्र देण्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. मात्र कामात कुचराई करुन अमिषापोटी दाखला देण्यास टाळाटाळ होत असल्याचा आरोप त्यांनी केला. नंदू डहाणे यांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे आदेश ग्रामसेवकांनी धुडकावले आहे. बांधकाम कामगार हा सर्वसामान्य घटक असून, कल्याणकारी योजनेपासून त्यांना वंचित राहण्याची वेळ आली असताना प्रशासकीय यंत्रणेला जाब विचारण्यासाठी आंदोलन करण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर यांच्या सहीने गट विकास अधिकारी यांना प्रस्तुत प्रकरणी बांधकाम कामगारांना ९० दिवसाचे प्रमाणपत्र नियमानुसार देण्याबाबत ग्रामसेवकांना सूचना करण्याचे लेखी पत्र काढण्यात आल्याने आंदोलन मागे घेण्यात आले.



सावेडीतील श्री समर्थ विद्या मंदिर प्राथमिक विभागाच्या नुतन मुख्याध्यापिकापदी धनश्री गुंफेकर यांना श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळाचे चेअरमन विकास सोनटक्के यांच्या हस्ते पदभाराचे पत्र देण्यात आले.

# सावेडीतील श्री समर्थ विद्या मंदिर प्राथमिक विभागाच्या नुतन मुख्याध्यापिकापदी धनश्री गुंफेकर यांनी घेतला पदभार

नगर – सावेडीतील श्री समर्थ विद्या मंदिर प्राथमिक विभागाच्या नुतन मुख्याध्यापिकापदी धनश्री गुंफेकर यांनी पदभार घेतला श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळाचे चेअरमन विकास सोनटक्के यांच्या हस्ते पदभाराचे पत्र देण्यात आले. यावेळी मंडळाचे उपाध्यक्ष दीपक ओहोळ, व्हा. चेअरमन श्रीपाद कुलकर्णी, सचिव प्र. स. ओहोळ, सचिव सुरेश क्षीरसागर, खजिनदार संजय कुलकर्णी, सचिन क्षीरसागर, सावेडी उच्च माध्यमिक व माध्यमिक विभाग शालेय समितीचे चेअरमन ॲड. किशोर देशपांडे, नाना जोशी, मुख्याध्यापिका तथा प्राचार्या श्रीमती संगीता जोशी आदी उपस्थित होते.

प्रथमतः मुख्याध्यापिका धनश्री गुंफेकर यांनी श्री समर्थांच्या प्रतिमेचे पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. मुलांनी व शिक्षकांनी नुतन मुख्याध्यापिका धनश्री गुंफेकर यांचे गुलाबाच्या पाकळ्या उधळून स्वागत करण्यात आले.

विकास सोनटक्के म्हणाले श्री समर्थ विदया मंदिर शाळा नेहमीच्या विदयार्थ्यांच्या उत्कर्षाकरीता काम करत आहे गुंफेकरच्या माध्यमातून त्याला नक्कीच हातभार लागणार आहे

मंडळाचे उपाध्यक्ष दीपक ओहोळ, व्हा. चेअरमन श्रीपाद कुलकर्णी, सचिव प्र. स. ओहोळ, सचिव सुरेश क्षीरसागर, खजिनदार संजय कुलकर्णी, सचिन क्षीरसागर, सावेडी उच्च माध्यमिक व माध्यमिक विभाग शालेय समितीचे चेअरमन ॲड. किशोर देशपांडे, नाना जोशी, मुख्याध्यापिका तथा प्राचार्या श्रीमती संगीता जोशी यांनीही गुंफेकर भावी वाटचालीकरीता शुभेच्छा दिल्या.

धनश्री गुंफेकर यांनी संस्थेनी मला काम करण्याची संधी दिली तसेच सर्व संस्थाचालक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्यानी मी काम करणार आहे. गुंफेकर यांनी आपल्या मनोगतातून संस्था, प्रशाला, सहकारी याविषयी कृतज्ञता व्यक्त केली.



### त्र्यंबकेश्वर येथील संत निवृत्तीनाथ महाराज पालखीचे हमाल पंचायत येथे स्वागत

त्र्यंबकेश्वर येथील संत निवृत्तीनाथ महाराज पालखीचे हमाल पंचायत येथे जिल्हा हमाल पंचायत च्या वतीने स्वागत जिल्हाध्यक्ष अविनाश घुले यांनी केले. यावेळी गोविंद सांगळे, मधुकर केकाण, रवींद्र भोसले, संजय महापुरे, ॲड. विक्रम वाडेकर, सतीश शेळके, संजय घुले, नवनाथ बडे, सागर पोळ, मंदाबाई सूर्यवंशी, रत्नाबाई आजबे आदी.

# लोकराज्य ऑटो रिक्षा व टॅक्सी चालक-मालक संघटनेच्या वतीने निर्मलनगर येथे रिक्षा थांब्याचे उद्घाटन

नगर – पाईपलाईन रोड सावेडी येथील निर्मलनगर येथे लोकराज्य ऑटो रिक्षा चालक-मालक संघटनेच्या वतीने रिक्षा थांबा (स्टॉप) चे उद्घाटन मनपाचे विरोधी पक्ष नेते संपत बारस्कर यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी संघटनेचे संस्थापक रामराजे (नागेश) शिंदे, जिल्हाध्यक्ष सितारम खाकाळ, कार्याध्यक्ष सुनील ठाकरे, शहराध्यक्ष सुनील गोरे, शहर कार्याध्यक्ष – दीपक गुंजाळ, जिल्हा सचिव ईश्वर जायभाय, जिल्हा संघटक भास्कर झुंजारे, शहर सरचिटणीस मच्छिंद्र शिंदे, खजिनदार राहुल चौधरी, जिल्हा उपाध्यक्ष रोहिदास बारस्कर, जिल्हाउपाध्यक्ष – रामदास तातु शिंदे, शाखाप्रमुख बबन उगलमुगले, शाखा उपाध्यक्ष अखिलेश पारख, खजिनदार सतिश आढाव, शाखा सचिव ओंकार गंजी आदी उपस्थित होते.



लोकराज्य ऑटो रिक्षा व टॅक्सी चालक-मालक संघटनेच्यावतीने निर्मलनगर येथे रिक्षा थांबा (स्टॉप) चे उद्घाटन करताना संपत बारस्कर. समवेत रामराजे शिंदे आदी. (छाया – लहू दळवी)

उद्घाटन प्रसंगी संपत बारस्कर म्हणाले, रिक्षा चालकांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. लोकराज्य ऑटो रिक्षा व टॅक्सी चालक-मालक संघटनेने रिक्षाचालकांचे प्रश्न सोडविण्यासाठी पुढाकार घेतला आहे. ही कौतुकास्पद बाब आहे. रिक्षा चालकांचे प्रश्न सोडवण्यासाठी सदैव तत्पर असल्याचे त्यांनी सांगितले आहे.

# जीवनज्योत मेडिकल फाउंडेशनतर्फे करियर, रोजगार व स्वंयरोजगाराची संधी

नगर– जीवनज्योत मेडिकल फाउंडेशनव्दारा रोजगार – स्वयंरोजगारच्या सुवर्णसंधी देणारे विविध मेडिकल, नर्सिंग, पॅरामेडिकल, तांत्रिक आणि व्होकेशनल (व्यवसायिक) कोर्सेस संस्थेतुन चालविले जातात. ही संस्था भारत सरकारच्या श्रम व रोजगार मंत्रालय, तसेच महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण मंडळ मुंबई व महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणेशी मान्यताप्राप्त संलग्न आहे.

मानवी जीवनाचा दर्जा उंचावण्यासाठी आरोग्याबरोबरच ज्ञानाची जोड असली पाहीजे. जीवनज्योत मेडिकल फाउंडेशन ही संस्था शैक्षणिक, सामाजिक, व्यवसायिक आणि वैद्यकिय शोध संस्था आहे. ही संस्था वैद्यकिय सुविधा, शिक्षण, जनजागृतीसाठी उदयास आलेली आहे. तसेच स्वयंरोजगाराच्या संधी आणि मानवी राहणीमान उंचावण्यासाठी या संस्थेतून मिळू शकते

वनविभाग ऑफीसमागे, नगर औरंगाबादरोड, नगर येथील बॉम्बे नर्सिंग होम इमारतीमध्ये कार्यालय आहे. 'मानवसेवा हीच खरी ईश्वरसेवा' हे ध्येय ठेवुन सन १९९४ साली संस्थेची स्थापना झाली. तीन मजली सुसज्ज इमारतीमध्ये अत्याधुनिक शिक्षण पध्दतीव्दारे तज्ञ मार्गदर्शन वर्ग या संस्थेमध्ये उच्च विभूषित तसेच नावाजलेल्या व्यक्तींचा स्टाफ त्यामध्ये डॉक्टर्स, नर्सेस, समुपदेशक, पॅथॉलोजिस्ट, तसेच शिक्षकांचा समावेश आहे. संस्थेमार्फत शिकविल्या जाणाऱ्या अभ्यासक्रमाची या पदांसाठी मागणी जास्त व उमेदवार कमी असल्यामुळे १००% नोकरीची संधी उपलब्ध आहे.

दहावी / बारावी व पदवीधर पास नापास मुलामुलींसाठी विविध कोर्सेस येथे चालवले जातात. दोन / एक वर्षात स्वकर्तृत्वावर उभे राहण्याची संधी व शासकीय नोकरीची पात्रता व संधी असलेले कोर्सेस येथे उपलब्ध आहे. तसेच महाराष्ट्र शासनाचे पमाणपत्र दिले जातात. प्रमाणपत्राची नोंद सेवा योजना कार्यालयास व रोजगार कार्यालय (एम्प्लॉयमेंट) मध्ये होते.

पॅरामेडिकल कोर्सेस, नर्सिंग क्षेत्रामधे ऑपरेशन थिएटर टेक्निशियन, नर्सिंग केअर, तसेच डिप्लोमा कोर्स इन फिजिओथेरापी, मेडिकल लॅब टेक्निशियन, रेडीओलॉजी टेक्निशियन, ( एक्स रे / इ.सी. जी /सिटी स्कॅन/ एम.आर.आय/ सोनोग्राफी/ कॅथलॅब) डायलॅसिस, हेल्थ अॅन्ड सॅनिटरी इन्सपेक्टर, ऑप्टोमेट्री, ऑप्टीशियन (चष्म्याचे नंबर काढणे, चष्मे, काचा व फ्रेम बनविणे, कॉन्टॅक्ट लेन्सची माहिती व बसविणे) डेंटल मेकॅनिक टेक्निशियन (कृत्रिम दात व कवळी बनविणे, दुरुस्ती करणे), डेंटल हायजिनिस्ट टेक. (तोंडाच्या आजाराची माहिती व तोंडाची देखरेख करणे), डेंटल असिस्टंट व डायटीशन असिस्टंट इत्यादी कोर्सेसचा समावेश आहे..

व्यवसायिक /तांत्रिक कोर्सेसमध्ये ब्युटीपार्लर अँड हेअर ड्रेसिंग, फायर अँड सेफ्टी मॅनेजमेंट, बांधकाम पर्यवेक्षक – स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक (आय. टी.आय. समकक्ष), कॉम्प्युटर टेक्नॉलॉजी व प्री प्रायमरी टिचर्स (बालवाडी / अंगणवाडी शिक्षिका) कोर्सेस चालविले जातात.

हे कोर्स उत्तीर्ण झाल्यावर विद्यार्थ्यांना स्वतःचा व्यवसाय करता येतो. शासकिय व खाजगी नोकरीची संधी. बांधकाम पर्यवेक्षक (स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक) कोर्स उत्तीर्ण झाल्यावर जिल्हा परिषद, नगरपालिका, महानगरपालिका, बी ॲण्ड सी व इतर विभागात शासकीय नोकरीची संधी उपलब्ध असुन पगार रु. ९३००-३४८०० ग्रेड पे रुपये ५६०० अशा प्रमाणात नेमणूक प्रक्रिया केली जाते. अशी माहीती प्राचार्यांनी दिली. अधिक माहीतीसाठी बॉम्बे नर्सिंग होम बिल्डींग, वनविभाग कार्यालयामागे, नगर औरंगाबादरोड, अहमदनगर. येथे संपर्क साधावा. मो. ८८३०६८५७३२. उपरोक्त पदांसाठी मागणी जास्त व उमेदवार कमी असल्यामुळे नोकरीची १००% संधी.

On line admission साठी www.jjmf.info वर भेट द्या.

संस्थेत पॅरामेडिकल शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना सुसज्ज हॉस्पीटलमध्ये प्रत्यक्ष सराव करण्याची संधी उपलब्ध करुन दिली जाते. संस्थेत शिक्षण घेतलेले अनेक विद्याथी आज मुंबई, पुणे, औरंगाबाद, नाशिक, अहमदनगर येथील मोठ्या हॉस्पीटलमध्ये कार्यरत असल्याचे संचालकांनी सांगितले.

सध्या वैदयकिय व्यवसाय व आधुनिक तंत्रज्ञानामुळे पॅरामेडीकल (अर्धवैद्यकिय) व व्यावसायिक / तांत्रिक क्षेत्रात स्टाफची मागणी वाढलेली आहे. जीवन ज्योत ही संस्था शासन मान्यता प्राप्त असल्यामुळे विद्यार्थ्यांना स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध होऊन त्यांचे राहणीमान उंचावले आहे.

विद्यार्थ्यांसाठी सर्व सोयीयुक्त सुसज्ज असे मुलीचे स्वतंत्र वसतीगृह आहे. लॅबरेटरी अत्याधुनिक उपकरणांसह संलग्न हॉस्पीटल, वर्कशॉप, लॅबरेटरी, ऑडीओ-व्हिडीओ लायब्ररी, कॉम्प्युटर / प्रोजेक्टरव्दारा प्रशिक्षण मेस, एस. टी व रेल्वे पासची सुविधा मोफत इंग्लिश स्पिकिंग व बेसिक कॉम्प्यूटर कोर्स, माफक शुल्क, हप्त्याने फी भरण्याची सोय सहाय्यता यासह रोजगार उपलब्धतेसाठी मार्गदर्शन व सहाय्यता विद्यार्थ्यांना केली जाते.

# रोटरी इंटरनॅशनलचे सामाजिक, शैक्षणिक कार्यात मोठे योगदान

Create hope in the world या थीम अंतर्गत अहमदनगर येथील रोटरी क्लब ऑफ अहमदनगर प्रियदर्शिनीच्या प्रेसिडेंट देविका रेळे यांनी वर्षभरात अनेक समाजोपयोगी कामे करुन आपला ठसा उमटविला आहे.

शालेय मुला मुलींमध्ये hopes create करण्याची गरज अधिक आहे हे ओळखून प्रेसिडेंट देविकाने रोटरी क्लब प्रियदर्शिनीच्या माध्यमातून तसेच क्लब सेक्रेटरी प्रभा खंडेलवाल आणि क्लबच्या सुहृद सदस्यांच्या मदतीने नगर जिल्ह्यातील विविध शाळांमध्ये त्यांच्या गरजेप्रमाणे साहित्य देऊन विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी उत्तेजन देण्याचा प्रयत्न केला आहे.

अहमदनगर जिल्ह्यातील देऊळगाव सिद्धी गावातील वाघमोडे वाडी येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेचा पूर्ण कायापालट केला आहे. रोटरी क्लब प्रियदर्शिनीच्या समाजाप्रती व शिक्षणाप्रती असलेल्या समर्पणाच्या भावनेतून साकारला गेला HAPPY SCHOOL हा प्रकल्प वाघमोडेवाडी येथील बहुतांश धनगर समाजाची मुले असलेल्या जिल्हा परिषदेच्या शाळेच्या उन्नतीसाठी रोटरी क्लब प्रियदर्शिनीने शाळेचे पुनरुज्जीवन केले आहे. या शाळेचे नूतनीकरण करण्याची खूपच गरज होती. तसेच अनेक शैक्षणिक साहित्याची आवश्यकता होती

प्रेसिडेंट देविका यांनी त्यांची गरज ओळखून रोटरी प्रियदर्शिनीच्या सदस्यांच्या मदतीने शाळेला सर्वतोपरी मदत करण्याचे ठरविले.

मुलांचा शाळेतील उत्साह वाढावा व वातावरण प्रसन्न व्हावे या विचाराने संपूर्ण शाळेला रंग देऊन सुशोभित केले. बबनराव सरगर पाटील यांनी एकट्याने शाळेला रंग दिला व विद्यार्थ्यांना उद्बोधक भित्तीचित्रे काढली. अहमदनगर येथील रोटेरियन कविता काणे यांच्या the kinder kid pre school च्या सहकार्याने हे रंगकाम केले गेले.

शाळेतील मुलांना आधुनिक शैक्षणिक सुविधांचा लाभ मिळावा म्हणून इ लर्निंगसाठी सीपीयू की बोर्ड दिला आहे. शिक्षणाची तळमळ असणाऱ्या रोटेरियन आशाताई फिरोदिया यांच्या योगदानातून हे शक्य झाले आहे. शाळेतील वर्गांचे वातावरण हवेशीर रहावे यासाठी इलेक्ट्रीक फॅन बसवून दिले. मुलांच्या आरोग्याचा विचार करुन त्यांना शुद्ध पाणी मिळावे म्हणून पाण्याच्या टाकीला फिल्टर बसवून दिले आहे. रो माधुरी झंवर, रो मंजू मुनोत, रो उर्मिला झालानी व रो स्वीटी पंजाबी यांच्या अर्थ साह्यातून या सुविधा शाळेला उपलब्ध करून देण्यात आल्या. विद्यार्थ्यांची वाचनाची गोडी वाढावी म्हणून प्रेसिडेंट देविका रेळे यांनी विविध विषयांवरील सत्तर पुस्तके देऊन वाचनालय सुसज्ज केले. जास्तीत जास्त मदत करुन शाळेला कॅपी स्कूलचा दर्जा मिळवून दिला आहे. या शाळेबरोबरच इतर १० जिल्हा परिषदेच्या शाळेतील वाचनालयांना उपयुक्त पुस्तके व ते ठेवण्यासाठी रॅक मदत म्हणून दिले.

याव्यतिरिक्त रो डॉ डुंगरवाल दांपत्याने डेंन्टल कॅम्पचे आयोजन करुन पं. नेहरु हिंदी विद्यालय च्या ४०० मुलांची मोफत तपासणी करुन मार्गदर्शन केले. बांधगाव येथील शाळेला रो स्मिता पोखर्णा यांनी ४० बेंचेस देऊन तेथील विद्यार्थ्यांची गैरसोय दूर केली. तांदळी वडगाव या छोट्याशा गावातील तीन शाळांना क्लब मेंबर्सनी मिळून खेळाचे साहित्य दिले. तेथील मुलांच्या चेहऱ्यावरील आनंद सर्वच क्लबच्या महिलांना सुखाऊन गेला.

रोटरी क्लब प्रियदर्शिनीच्या रो प्रतिभा धूत यांनी श्रीगोपाल रामनाथ धूत फौंडेशन यांच्या CSR फंडातून व इपिटोम कांपोनंटस् प्रा.लि.च्या सहकार्याने अनेक उपक्रम राबवून रोटरी प्रियदर्शिनीच्या समाजोपयोगी कामाला हातभार लावला आहे. त्यामध्ये श्रीकांत पेमराज गुगळे शाळा व प्रगत शाळेला मुलींसाठी स्वच्छतागृह दिले आहेत. सीताराम सारडा शाळेला माईक सिस्टीम व इतर शैक्षणिक साहित्य दिले आहे.

ॲबट स्कूल भिंगारमध्ये बोअरवेल बसवून दिले तसेच युवान या संस्थेत मुलींचे वसतीगृह सुरु करुन दिले. रो डॉ. पद्मा कुलकर्णी, डॉ. स्मिता तारडे व डॉ. सुमा वाघ यांनी महिला व मुलींना कॅन्सर व इतर आजारांबद्दल मार्गदर्शन केले.

शाळांना मदत करीत असतानाच वृक्षारोपण, मुलींच्या वसतीगृहाला मदत करणे तसेच एकल महिलांना स्वावलंबी बनविण्यासाठी आटा चक्की व शिवण यंत्रांचे वाटप करणे. रिमांडहोम मधील मुलींना व्यावसायिक शिक्षण देणे, महिलांना मसाले बनवा व इन्स्टंट पदार्थ बनविण्याची मोठी कार्यशाळा घेऊन समाजात रोटरी क्लब प्रियदर्शिनीबद्दल मानाचे स्थान मिळवून दिले आहे.

वर्षभरात जी सामाजिक कामे केली ती करताना प्रेसिडेंट देविका यांनी ती खरोखरच गरजवंतांनाच केली गेली याची खातरजमा केली आहे. तसेच ज्यांनी ही मदत केली ते त्यामुळे आनंदी तर झालेच पण त्याचा पुरेपूर उपयोग करीत आहेत. ज्यांना ज्यांना रोटरी क्लब प्रियदर्शिनीने मदत केली आहे त्यांचे क्लबशी स्नेहाचे नाते जोडले गेले आहे.

रोटरी क्लबचे जे उद्दिष्ट्य आहे ते परिपूर्ण करण्यात प्रेसिडेंट देविका यशस्वी झाल्या आहेत. त्यांचे कणखर नेतृत्व व सर्व रोटरी सदस्यांच्या भरघोस मदतीने अनेक उपक्रम यशस्वी झाले आहेत. यापुढेही नवीन प्रेसिडेंट मिनल बोरा यांच्या नेतृत्वाखाली रोटरी क्लब प्रियदर्शिनी सामाजिक कार्यांत अग्रेसर राहिल यात शंका नाही. **– विभा तांबडे, रोटेरियन**

# शिक्षकाच्या आत्महत्येप्रकरणी तीन शिक्षकांची निर्दोष मुक्तता

नगर – अहमदनगर शहरात केडगांव भागात प्लॉट नंबर ८, चर्चरोड, भुषणनगर, येथे मयत प्रदीप प्रभाकर शेजूळ (वय ४३) हे जय मल्हार शिक्षण संस्था, पिंपळगांव रोठा, ता.पारनेर, जि.अहमदनगर येथे इंग्रजी माध्यमाचे शिक्षक म्हणून नोकरीस असतांना त्यांच्या वर्गातील विद्यार्थिनीने आत्महत्या केली होती. त्या आत्महत्येस आरोपी हे प्रदीप यास कायम दोषी ठरवत होते. सर्व आरोपी हे त्यांना सुमारे ५-६ वर्षांपासून त्रास देत होते व वेळोवेळी त्या विद्यार्थिनीच्या आत्महत्येस तूच कारणीभुत आहेस, असे वेळोवेळी बोलून त्यांना मानसिक त्रास दिल्याने त्यांच्या त्रासाला कंटाळून 'मी आज हे जग जरांगे सर, सुंबरे सर आणि गटकळ सर यांच्यामुळे सोडून जात आहे, ते मला त्या विद्यार्थिनीच्या आत्महत्येप्रकरणी कायम दोषी ठरवत आहेत व हे सगळे जण मला ५-६ वर्षांपासून त्रास देत आहेत,' अशी इंग्रजी माध्यमातून चिठ्ठी लिहून ठेवून ३/३/२०१४ ला स्वत:चे घरातील किचन रुममधील छताचे हुकास गळफास घेऊन आत्महत्या केली. त्या आत्महत्येस आरोपी क्र.१ नामदेव बप्पासाहेब जरांगे, मुळ राहणार मु.पो.मातोरी, ता.शिरुर कासार, जि.बीड, हल्ली रा. पिंपळगांव रोठा, ता. पारनेर, जि.अहमदनगर, आरोपी क्र.२ उत्तम गणपत सुंबरे, रा.पिंपळगांव रोठा, ता.पारनेर, जि.अहमदनगर, आरोपी क्र.३ भिकाजी शंकरराव गरकळ, मुळ रा.घोगसे पारगांव, ता.शिरुर कासार, जि.बीड यांनी आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले म्हणून मयत प्रदीप याचे भावाने दिलेल्या फिर्यादीवरुन पारनेर पोलिसांनी वरील तिनही आरोपींचे विरुद्ध भा.द.वि.कलम ३०६ सह ३४ अन्वये गुन्हा दाखल केला. त्याची सुनावणी अहमदनगर येथील प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधिश सुधाकर यार्लगड्डा यांच्या समोर होऊन त्यात सर्व तिनही शिक्षक आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात आली.

सदरच्या खटल्यात सरकार पक्षातर्फे एकंदर ७ साक्षीदार तपासण्यात आले, त्यात फिर्यादी मयत प्रदीपचा भाऊ व हस्ताक्षर तज्ञ पुणे यांच्या साक्षी महत्वाच्या होत्या. हस्ताक्षर तज्ञ यांची साक्ष ही आधुनिक तंत्रज्ञानाचे मदतीने व्हीडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे नोंदविण्यात आली. परंतु तासाभराच्या उलट तपासानंतर आरोपींचे वकिलांनी घेतलेल्या हरकतीनंतर न्यायालयाने त्यांना पुढील तारखेस स्वत: अहमदनगर न्यायालयात हजर राहण्याचा हुकूम केला. सदर हस्ताक्षर तज्ञांना उलट तपासात वकिलांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देता आली नाहीत. तसेच ती आत्महत्येची चिठ्ठी ही मयताचे हस्ताक्षरातील नाही तसेच अजून एक मराठीतील आत्महत्येची चिठ्ठी होती, त्यातील आत्महत्येचे कारण वेगळेच होते. म्हणून ती चिठ्ठी रेकॉर्डवर घेण्यात आली नाही. तसेच मयताचा भाऊ याने वरील तिनही आरोपींकडे पैशाची मागणी केली होती व ते पैसे न दिल्याने आरोपींना त्रास देण्यासाठी खोटी हकिगत करुन खोटी फिर्याद दिली. त्या कारणांचा व आरोपींचा काहीही संबंध नाही. तसेच त्यांनी आत्महत्येस प्रवृत्त केले हे शाबीत झाले नाही.

वरील सर्व बाबींचा विचार करुन न्यायालयाने तिनही आरोपींना निर्दोष सोडल्याचे जाहीर केले. आरोपींतर्फे ॲड.सतिशचंद्र सुद्रिक यांनी काम पाहिले.



मार्केट यार्ड येथे संत श्री निवृत्तीनाथ महाराज पायी दिंडी सोहळ्याप्रसंगी त्र्यंबकेश्वर ते पंढरपूर मोफत वैद्यकीय सेवेचा शुभारंभ नगर जिल्हा विश्व हिंदू परिषदेचे वतीने करण्यात आला. याप्रसंगी हभप मुरलीधर सांगळे महाराज, डावरे महाराज, नानासाहेब जाधव, संदीप रासने, ॲड.जय भोसले, शरदराव नगरकर, सुनील खिस्ती, गजेंद्र सोनवणे आदी.

# वारकऱ्यांना श्री विठुरायाच्या दर्शनाची ओढ

**ॲड. जय भोसले यांचे प्रतिपादन; त्र्यंबकेश्वर ते पंढरपूर पायी दिंडी सोहळात विश्व हिंदू परिषदेचा मोफत वैद्यकीय सेवेचा शुभारंभ**

नगर – ऊन, वारा, पाऊस कशाचीही तमा न बाळगता वारकरी विठुरायाच्या दर्शनासाठी पंढरपूरला पायी दिंडी सोहळ्यात सहभागी होत असतात. वारकऱ्यांचा पंढरपूर पर्यंतचा प्रवास निरोगी व सुखकर व्हावा. यासाठी विश्व हिंदू परिषदेने संत ज्ञानेश्वर महाराज दिंडी सोहळा (आळंदी), संत तुकाराम महाराज (देहू), संत निवृत्तीनाथ महाराज पायी दिंडी सोहळा (नाशिक), संत एकनाथ महाराज पायी दिंडी सोहळा (पैठण), या प्रमुख चारही मार्गावर पश्चिम महाराष्ट्र विश्व हिंदू परिषदेचे वतीने मोफत वैद्यकीय सेवा देण्यात येत आहे.वारकऱ्यांचे निरोगी आरोग्य रहावे. हाच प्रमुख उद्देश या सेवेचा आहे, असे प्रतिपादन विश्व हिंदू परिषदेचे अध्यक्ष ॲड. जय भोसले यांनी केले आहे.

मार्केट यार्ड येथे संत श्री निवृत्तीनाथ महाराज पायी दिंडी सोहळ्याप्रसंगी त्र्यंबकेश्वर ते पंढरपूर मोफत वैद्यकीय सेवेचा शुभारंभ नगर जिल्हा विश्व हिंदू परिषदेचे वतीने करण्यात आला.

याप्रसंगी हभप मुरलीधर सांगळे महाराज, डावरे महाराज, पश्चिम महाराष्ट्र प्रांत संघचालक नानासाहेब जाधव, संदीप रासने, विश्व हिंदू परिषदेचे अध्यक्ष ॲड.जय भोसले, जिल्हा सहमंत्री शरदराव नगरकर, विभाग मंत्री सुनील खिस्ती विभागाचे विशेष संपर्क प्रमुख गजेंद्र सोनवणे, सेवा भारतीचे डॉ.मनोहर देशपांडे, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख अमोल भांबरकर, केमिस्ट असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष दत्ता गाडळकर, राजेंद्र चुंबळकर, भारतीय किसान संघाचे जिल्हा मंत्री निलेश चिपाडे, सतीश पाटील यात्रा प्रमुख, अरविंद ब्राह्मणकर, डॉ.ज्ञानेश्वर कमोद, शिवाजी बोराडे, सुनील जोशी, नरेंद्र शर्मा, डॉ.राजन कुलकर्णी, मनोहर राहणे, विकास साळवे, उत्तम वायचळे, आशालता कुमावत, सुभाष जाधव आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन गजेंद्र सोनवणे यांनी केले. तर आभार सुनिल खिस्ती यांनी मानले.

# दीड हजार विद्यार्थ्यांना शैक्षणिक किट वाटपाचा प्रारंभ



घर घर लंगर सेवा, लायन्स क्लब ऑफ अहमदनगर व लिओ क्लबतर्फे दादा चौधरी विद्यालयातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक किटचे वाटप करण्यात आले.

**घर घर लंगर सेवा, लायन्स क्लब ऑफ अहमदनगर व लिओ क्लबचा पुढाकार**

नगर – कोरोना काळात गरजूंची भुक भागविणाऱ्या व आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना आधार देणाऱ्या घर घर लंगर सेवा, लायन्स क्लब ऑफ अहमदनगर व लिओ क्लब ऑफ अहमदनगर यांच्या वतीने शहरातील गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप मोहिमेचे प्रारंभ दादा चौधरी विद्यालयापासून करण्यात आले. या मोहिमेतंर्गत जिल्ह्यातील दीड हजार विद्यार्थ्यांना शैक्षणिक किटचे वाटप केले जाणार आहे.

दादा चौधरी विद्यालयात शरद मुनोत यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या शैक्षणिक साहित्य वाटप कार्यक्रम प्रसंगी घर घर लंगर सेवेचे जनक आहुजा, हरजितसिंह वधवा, प्रितपालसिंह धुप्पड, सतीश गंभीर, प्रशांत मुनोत, सुनिल थोरात, मुन्ना जग्गी, राजेंद्र कंत्रोड, गुलशन कंत्रोड, कैलाश नवलानी, दादा चौधरी विद्यालयाचे मुख्याध्यापक सुनिता जामगावकर, मेहेर इंग्लिश स्कूलच्या प्राचार्या अनुरिता झगडे आदींसह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

हरजितसिंह वधवा म्हणाले की, कोरोना काळापासून विद्यार्थ्यांना आधार देण्याचे काम लंगर सेवेच्या माध्यमातून करण्यात आले आहे. दरवर्षी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन देण्यात येत आहे. ही सेवा जिल्ह्यापुरती मर्यादीत न राहता राज्यात व राज्याबाहेर देखील पोहचली असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

शरद मुनोत म्हणाले की, घर घर लंगर सेवेचे समाजकार्य स्फुर्ती व प्रेरणा देणारे आहे. त्यांच्या नवनवीन संकल्पना समाजातील गरजूंना आधार ठरत आहे. लंगर सेवेचे सेवादार विविध सामाजिक कार्याने जोडले गेले असून, शहरात एक मोठी सामाजिक चळवळ या सेवादारांच्या माध्यमातून उभी राहिली असल्याचे त्यांनी सांगितले.

प्राचार्या प्रा. अनुरीता झगडे यांनी घर घर लंगर सेवेच्या माध्यमातून गरजवंत मुलांना शालेय साहित्य व दप्तर मिळाल्याने विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळणार असल्याचे स्पष्ट केले. मुख्याध्यापक सुनिता जामगावकर यांनी लंगर सेवेच्या माध्यमातून शिक्षण क्षेत्रात सुरु असलेले योगदान कौतुकास्पद असल्याचे सांगितले.

उपस्थित पाहुण्यांच्या हस्ते दादा चौधरी विद्यालय व मेहेर इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य असलेल्या किटचे वितरण करण्यात आले. या किटमध्ये दप्तर, चार नोटबुक व कंपासचा समावेश आहे. तसेच सिताराम सारडा विद्यालयातही शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

परिस्थिती अभावी विद्यार्थ्यांचे शिक्षण अर्धवट राहू नये, यासाठी त्यांना शिक्षणास प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. जिल्ह्यातील विविध गाव, तालुका पातळीवर व नांदेड, बीड, गोवा येथे देखील लंगर सेवेच्या माध्यमातून शैक्षणिक साहित्याची गरजू विद्यार्थ्यांना वाटप होणार आहे. या उपक्रमासाठी शरद मुनोत, डॉ. एस.एस. दीपक व उत्कर्षा रुपवते यांचे विशेष सहकार्य लाभले आहे.

हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी लायन्सचे अध्यक्ष धनंजय भंडारे, राहुल बजाज, सोमनाथ चिंतामणी, राजू जग्गी, राजा नारंग, सिमर वधवा, जस्मीतसिंह वधवा, सुनील छाजेड, राजेश कुकरेजा, अर्जुन मदान, मनोज मदान, दामोदर माखिजा, शरद बेरड, सुनिल मेहतानी, करण धुप्पड, अमरजितसिंह वधवा, बलजित बिलरा, जय रंगलानी, विपुल शाह, डॉ. संजय असनानी, प्रमोद पंतम, दलजीतसिंह वधवा, सनी वधवा, जतिन आहुजा, किशोर मुनोत, संदेश रपारिया आदी प्रयत्नशील आहेत.

# शिष्यवृत्ती परिक्षेत कृष्णा चन्ना राज्यात चौथा, जिल्ह्यात प्रथम

नगर – महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद, पुणे यांच्यावतीने घेण्यात



आलेल्या इ.५ वी पुर्व उच्च माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेचा नुकताच निकाल जाहीर झाला असून, यामध्ये नगर, सावेडी येथील ऑक्झिलियम कॉन्व्हेंट हायस्कूलचा विद्यार्थी चि.कृष्णा रविंद्र चन्ना याने २९४ पैकी २८० गुण मिळवत राज्यात चौथा तर जिल्ह्यात शहरी विभागात पहिला येण्याचा मान पटकाविला.

या परिक्षेस राज्यातून सुमारे १ लाख २२ हजार ६३६ विद्यार्थी पात्र होते. त्यापैकी १६,६९१ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळाली. चि. कृष्णा चन्ना यास प्रिन्सीपल निलिमा रॉड्रीक्स, सौ.जयश्री कासवा, आई सुरेखा, वडिल रविंद्र चन्ना, बहिण कु.सई चन्ना यांचे मार्गदर्शन लाभले.

कु. कृष्णा चन्ना यांने यापुर्वी गणित प्रज्ञा परिक्षत जिल्ह्यात प्रथम, हेडगेवार प्रज्ञाशोध परिक्षेत जिल्ह्यात प्रथम, तर दरवर्षी ऑलिपियाड स्पर्धेत प्रथम येण्याचा मान मिळवत आहे.

# डिजिटल युगात ऑनलाईन मार्केटिंगला खूप महत्व : डॉ. एम.बी. मेहता

**आयएमएसमध्ये डिजिटल मार्केटिंग सर्टिफिकेट कोर्सच्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वितरण**



आयएमएस संस्थेमध्ये डिजिटल मार्केटिंग सर्टिफिकेट कोर्सच्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वितरण करताना संचालक डॉ. एम. बी. मेहता. समवेत उपसंचालक डॉ. विक्रम बार्नबस, डॉ. मनोज कुलकर्णी, श्रुती मुनोत.

नगर – सध्याच्या डिजिटल युगात ऑनलाईन मार्केटिंगला खूप महत्व प्राप्त झाले आहे. विद्यार्थी तसेच व्यावसायिकांना ऑनलाईन मार्केटिंगचे ज्ञान आवश्यक बनले आहे. त्यादृष्टीने बीपीएचई सोसायटीच्या आयएमएस सीडीआर संस्थेने डिजिटल मार्केटिंग संबंधी ३ महिन्यांचा सर्टिफिकेट कोर्स तयार केला आहे. या कोर्समुळे विद्यार्थ्यांना नक्कीच स्वतःला सिद्ध करता येईल. अनुभवी आणि तज्ज्ञांचे मार्गदर्शन असल्याने भविष्यात अनेक जण या कोर्सचा लाभ घेतील, असा विश्वास आयएमएसचे संचालक डॉ. एम.बी. मेहता यांनी व्यक्त केला.

आयएमएस येथे डिजिटल मार्केटिंग विषयावरील तीन महिन्यांच्या कोर्सच्या पहिल्या बॅचच्या विद्यार्थ्यांना डॉ. एम. बी. मेहता यांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आली. याप्रसंगी संस्थेचे उपसंचालक डॉ. विक्रम बार्नबस, कोर्स समन्वयक डॉ. मनोज कुलकर्णी, कोर्स प्रशिक्षक श्रुती मुनोत तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

प्रास्ताविकात डॉ. मनोज कुलकर्णी म्हणाले की, संस्थेने सामाजिक जाणीवेतून सर्वांना परवडेल अशा फि मध्ये हा कोर्स उपलब्ध करून दिला आहे. याच कोर्ससाठी विद्यार्थी पुणे, मुंबईला जात होते. आता नगरमध्येच कोर्स सुरू झाल्याने विद्यार्थ्यांचा फायदा होणार आहे.

श्रुती मुनोत म्हणाल्या, विद्यार्थ्यांनी या कोर्सला अतिशय चांगला प्रतिसाद दिला आहे. आताच्या काळात कोणताही व्यवसाय करताना डिजिटल मार्केटिंग करणे खूप गरजेचे आहे. या क्षेत्रात विद्यार्थ्यांना करियरच्याही अनेक चांगल्या संधी आहेत. त्यादृष्टीने या कोर्समध्ये आवश्यक कौशल्ये तसेच सर्च इंजिन ऑप्टीमायझेशन (एसईओ), सोशल मिडिया मार्केटिंग, ई मेल मार्केटिंग, कंटेंट स्ट्रटेजी, नालिटिक्स आदी विषयांचे सखोल ज्ञान प्रात्यक्षिकांसह दिले जाते. दर शुक्रवारी व शनिवारी या कोर्सचे वर्ग घेतले जातात. त्यामुळे विद्यार्थी, व्यावसायिकांना दैनंदिन काम करून हा कोर्स करता येतो.

कोर्स यशस्वीरीत्या पूर्ण केलेली विद्यार्थीनी सिद्धी गांधी म्हणाली, आजचे युग डिजिटल झाले आहे. डिजिटल मार्केटिंग करणे आवश्यक बनले आहे. या कोर्समुळे खूप नवीन ज्ञान मिळाले. त्याचा उपयोग आम्हाला आमच्या क्षेत्रात काम करताना निश्चितच होईल. श्रुती मुनोत यांनी अतिशय प्रभावीपणे आम्हाला शिकवले. संदेश राठोड या विद्यार्थ्यानेही मनोगत व्यक्त केले. शेवटी डॉ. विक्रम बार्नबस यांनी आभार मानले. या कोर्सची दुसरी बॅच १५ जुलै पासून सुरू होणार आहे. प्रवेश प्रक्रिया व माहितीसाठी संपर्क: डॉ.मनोज कुलकर्णी (मो.९४२३३३१७५८), महेश दिक्षीत (मो.९२७१२२५१०६).

# वाटणी जर निर्मात्याच्या मार्गदर्शनानुसार झाली तर कुटूंबात व एकंदरीत समाजात शांतता नांदण्यास मदत होईल

**प्रो. सय्यद मुदस्सर लिखित 'इस्लामी क़ानून ए विरासत' या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा**



प्रा. सय्यद मुदस्सर लिखित 'इस्लामी क़ानून ए विरासत' या पुस्तकाचे प्रकाशन करताना पुणे येथील मौलाना हामिद इसहाक जलिस नदवी. समवेत नौशाद उस्मान, डॉ. महेबुब सय्यद, बुशरा नाहीद आदी.

नगर – 'कुटुंबामध्ये कलह, वाद निर्माण करणाऱ्या कारणांपैकी एक प्रमुख कारण म्हणजे मृताच्या मालमत्तेची वाटणी. ही वाटणी जर निर्मात्याच्या मार्गदर्शनानुसार झाली तर कुटूंबात व एकंदरीत समाजात शांतता नांदण्यास मदत होईल', असे प्रतिपादन मौलाना कारी अबरारुल हक यांनी केले. ते प्रा. सय्यद मुदस्सर लिखित 'इस्लामी क़ानून ए विरासत' या पुस्तकाचा प्रकाशन सोहळ्या निमित्त बोलत होते.

३० जुन रोजी हा प्रकाशन सोहळा सी एस आर डी ऑडीटोरीयम येथे झाला. कार्यक्रमास पुणे येथील मौलाना हामिद इसहाक जलिस नदवी, लेखक नौशाद उस्मान, सीटू जिल्हाध्यक्ष डॉ. महेबुब सय्यद, ग्लोबल लाईट पब्लिशरच्या बुशरा नाहीद प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

कुरआण मधील शिकवणुकींवर आधारित वारसा कायदा यावर अरबी, उर्दू भाशांमध्ये भरपुर साहित्य उपलब्ध आहे. परंतु मराठी, हिंदी, इंग्रजी माध्यमातुन शिकलेल्यांसाठी या महत्त्वाच्या विषयावर योग्य ती पुस्तके नसल्या कारणाने या विषयाबाबत अज्ञान तसेच उदासीनता दिसून येते. प्रा. मुदस्सर यांनी हे पुस्तक देवनागरी लिपीत लिहिलेले असल्याकारणाने अशा वाचकांची मोठी सोय होईल अशी आशा आहे.

कोणत्याही इसमाच्या मृत्यु नंतर त्याच्या मालमत्तेची योग्य रीतीने, निष्पक्षपाती पद्धतीने वाटणी होणे गरजेचे आहे. ही वाटणी सविस्तर पद्धतीने कुरआणात सांगितली गेली आहे. आज समाजात, कुटुंबात होणाऱ्या भांडणांचे एक प्रमुख कारण म्हणजे मृताच्या मालमत्तेची वाटणी व त्यावरुन होणारे वाद हे आहेत. हे वाद योग्य वेळी थांबले नाहीत तर पोलीस, कोर्ट इथपर्यंत जातात. या पुस्तकात या बाबींवर भर देऊन परस्पर सामंजस्य निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. तसेच इस्लामचा वारसा कायदा, त्याची मार्गदर्शक तत्वे, नियम इत्यादींची सविस्तर माहिती देण्यात आली आहे.

सुत्रसंचलन सुहेल सय्यद यांनी केले. आभार प्रदर्शन इंजि. सय्यद ज़हिर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सय्यद इर्शाद, सय्यद इरफान, सय्यद रीज़वान, शेख ज़फर, शेख जुनेद, सय्यद अतहर, शेख आसिफ शालिमार, सुफियान काज़ी यांनी विशेष परिश्रम घेतले.

११२ पानी पुस्तकाची किंमत फक्त रु. १२० आहे. आपली प्रत मिळवण्यासाठी आपण ९८८१४५८५७९ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन ग्लोबल लाईट पब्लिशर यांनी केले आहे.

# रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रलच्या अध्यक्षपदी डॉ. कुणाल कोल्हे, सेक्रेटरीपदी सुनील कटारिया





नगर – रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रलच्या अध्यक्षपदी डॉ. कुणाल कोल्हे यांची तर सेक्रेटरीपदी सुनिल कटारिया यांची निवड झाली आहे. खजिनदारपदी उमेश रेखे आणि कार्यकारी सेक्रेटरीपदी हरिष नय्यर यांची निवड झाली आहे. सन २०२४-२५ या वर्षासाठी ही निवड सर्वानुमते करण्यात आली आहे.

नवीन कार्यकारिणीत उपाध्यक्षपदी गोविंद कनोजिया, क्लब डमिनिस्ट्रेटर प्रसन्न खाजगीवाले, क्लब ट्रेनर ईश्वर बोरा, मेंबरशिप डेव्हलपमेंट चेतन अमरापूरकर, इंटरनॅशनल सर्व्हिस हितेश गुप्ता, आर आय मनिष बोरा, सतिश कटारिया, मेडिकल डायरेक्टर डॉ. दिलीप बागल, कम्युनिटी सर्व्हिस गिरीश मुळे, युथ सर्व्हिस आदित्य गांधी, व्होकेशनल सर्व्हिस निखिल कटारिया, पर्यावरण सेवा निवृत्ती झिने, बुलेटिन एडिटर डॉ. किर्ती कोल्हे, साक्षरता अभियान श्रेया खाजगीवाले, आयटी सर्व्हिस अतुल बोरा, सांस्कृतिक सुजाता कटारिया, क्रीडा अभिजित कोठारी, सल्लागारपदी शिरीष रायते, डॉ. एस. व्ही. जोशी यांची निवड करण्यात आली आहे.

नूतन अध्यक्ष डॉ. कुणाल कोल्हे म्हणाले की, रोटरीला सामाजिक कार्याची मोठी परंपरा आहे. शिक्षण, आरोग्य, सेवा अशा विविध उपक्रमात रोटरी परिवार नेहमीच अग्रेसर असतो. रोटरी सेंट्रलने मावळते अध्यक्ष हरिष नय्यर यांच्या अध्यक्षतेखाली गेल्या वर्षभरात अनेक पथदर्शी प्रकल्प राबविले.

नगर शहरात रोटरी शॉपिंग फेस्टिवल घेण्यात आला. याशिवाय शहरात प्रथमच जवळपास सर्व हॉस्पिटलमधील परिचारिकांचा आनंद मेळावा घेऊन त्यांचा सन्मान केला. रोटरी सेंट्रलच्या पहिल्या ग्लोबल ग्रँट अंतर्गत नवजात शिशू न्यूरोक्रिटिकल केअर मशीन व प्रशिक्षण या महत्वाकांक्षी प्रकल्पाचा लोकार्पण सोहळाही पार पडला. आगामी काळातही सर्व रोटरियन्स याच पद्धतीने समाजासाठी आदर्शवत काम करतील अशी ग्वाही त्यांनी दिली.



देवदारी घाटात ५ वेगवेगळ्या प्रकारच्या १०१ झाडांची लागवड करुन क्रिकेट प्रेमी डॉक्टरांनी भारतीय क्रिकेट संघाचा विजय साजरा करताना डॉ. जगदीश भराडीया व त्यांचे सहकारी डॉक्टर्स.

# भारतीय संघाच्या विजयानंतर देवदारी घाटात क्रिकेटप्रेमी डॉक्टरांकडून १०१ झाडांची लागवड

नगर – १७ वर्षानंतर भारताने टी ट्वेंटी वर्ल्ड कप जिंकला. त्यानिमित्ताने नगर मधील क्रिकेट प्रेमी डॉक्टरांनी (DON-११ संघाने) सेलिब्रेशन आणि निसर्ग प्रेम याचा सुवर्णयोग साधत देवदारी घाटात ५ वेगवेगळ्या प्रकारची १०१ झाडे लावली. यात कडुलिंब, सीताफळ, लक्ष्मीतरु, कलंज, शिसू झाडाचा समावेश केला.

फक्त झाडे लावून ही डॉक्टर मंडळी थांबणार नसून ह्यातील सगळे झाडे कशी वाढतील, उन्हाळ्यातीळ पाण्याचे नियोजन आणि झाडे मोठी कशी होतील याचेही नियोजनही त्यांनी केले आहे. वाढत्या तापमानाचे नियोजन आतापासून केले तर आपल्या पुढील पिढीला याचा त्रास होणार नाही. झाडे लावण्यासाठी डॉ. जगदीश भराडीया, डॉ. प्रताप घोडके, डॉ. विकास दुसुंगे, डॉ. विकी गांधी, लेफ्ट. कर्नल सोमेश्वर गायकवाड, डॉ. ओंकार भालसिंग, डॉ. वैभव भोईटे, डॉ. प्रतीक वैरागर, डॉ. सचिन साळे यांनी स्वखर्चातून हा उपक्रम राबवला.

यापुढेही झाडे लावून त्याचे संगोपन करण्याचा व हरितनगर घडवण्याचा संकल्प या डॉक्टरांनी केला आहे.

# वारकऱ्यांची सेवा केल्याने पुण्य मिळते

**बाळासाहेब चंगेडे यांचे प्रतिपादन**




खिस्तगल्ली येथील वर्धमान तरुण मंडळाच्यावतीने त्र्यंबकेश्वर येथील निवृत्तीनाथ महाराज दिंडीतील वारकऱ्यांना अल्पोहार वाटप करण्यात आले. (छाया – मुकुंद भट)

**वर्धमान तरुण मंडळाच्यावतीने त्र्यंबकेश्वर दिंडीतील वारकऱ्यांना अल्पोहार वाटप**

नगर – आषाढी एकदाशी आली की, वारकऱ्यांना पंढरीच्या विठ्ठलाच्या भेटीची आस लागत असते. लाखोंच्या संख्येने वारकरी पायी दिंडीने पंढरपुला जातात. ऊन, वारा, पाऊस याची तमा न बाळगता हे वारकरी न थकता शेकडो मैल प्रवास करतात. आपल्या लाडक्या पांडूरंगाला भेटीची आस लागली असल्याने तहान-भुक हरपून चालत राहतात. या वारकऱ्यांची सेवा केल्याने पुण्य मिळत असल्याने त्यांच्या सेवेत धन्यता मानली आहे. आज वर्धमान तरुण मंडळाच्यावतीने या दिंडी वारकऱ्यांना अल्पोहार वाटप करण्यात आले आहे. गेल्या ३० वर्षांपासून दिंडीतील वारकऱ्यांची मनोभावे सेवा मंडळाच्यावतीने करण्यात येत असल्याचे प्रतिपादन बाळासाहेब चंगेडे यांनी केले.


खिस्तगल्ली येथील वर्धमान तरुण मंडळाच्यावतीने त्र्यंबकेश्वर येथील निवृत्तीनाथ महाराज दिंडीतील वारकऱ्यांना अल्पोहार वाटप करण्यात आले. याप्रसंगी मंडळाचे अध्यक्ष बाळासाहेब चंगेडे, उपाध्यक्ष किरण शिंगी, प्रविण कोठारी, संतोष भंडारी, बबन चंगेडे, भुषण चंगेडे, प्रशांत डागा, राजू बंब, निखिल फिरोदिया, प्रज्योत भंडारी, पियुष लुंकड, अमोल शिंगी, श्रेणिक शाह, मयुर पवार, नंदकुमार गुजराथी आदिंसह सदस्य उपस्थित होते.

यावेळी उपाध्यक्ष किरण शिंगी म्हणाले, गणेशोत्सवाबरोबरच, क्रीडा, कला, सांस्कृतिक कार्यक्रमाबरोबरच रक्तदान शिबीर, वृक्षारोपण, अन्नदान असे उपक्रम जयंती, उत्सवानिमित्त वर्धमान तरुण मंडळाच्यवतीने राबविण्यात येत असतात. या उपक्रमात आषाढी एकादशीनिमित्त दिंडीतील वारकऱ्यांची सेवाही मंडळाच्यावतीने दरवर्षी करण्यात येत असते. या वारकऱ्यांना अन्नदानाबरोबरच आरोग्यसेवा व आवश्यक वस्तूंचेही वाटप केले जात असते. आज निवृत्तीनाथांच्या दिंडीतील वारकऱ्यांचे स्वागत करुन मोठे समाधान लाभल्याचे सांगितले.




# कॅलिडोस्कोप

## पार्सलमधून आला नाग!




**आ**जकाल ऑनलाईन खरेदीचा जमाना आहे. आपल्यापैकी अनेक जण बरेच सामान ऑनलाइन ऑर्डर करत असतात. बंगळुरूमधील एक जोडप्यानेही ऑनलाइन सामान मागवले. पण डिलिव्हरी झाल्यावर त्यांनी सामानाचा बॉक्स उघडला, तेव्हा समोरचं दृश्य पाहून त्यांची दातखिळीच बसली. बॉक्स उघडताच त्यांच्यासमोर एक कोब्रा फुत्कार टाकताना दिसला. ते पाहून जोडप्याची भीतीने गाळण उडाली.

अ‍ॅमेझॉनवरून आलेल्या सामानात साप असल्याचा दावा त्या जोडप्याने केला असून त्याबद्दल त्यांनी 'सोशल मीडिया'वर पोस्टही शेअर केली. नशीबाने तो साप त्या बॉक्सच्या चिकटपट्टीला चिकटला होता. त्यामुळे त्यांना इजा झाली नाही. तो मोकळा असता तर कोणाला चावूही शकला असता. या घटनेमुळे ई-कॉमर्स कंपन्यांचे पॅकेजिंक आणि डिलीव्हरी प्रक्रियेवरून नवा वाद सुरू झाला आहे.

त्यांच्या सांगण्यानुसार, दोन दिवसांपूर्वी अ‍ॅमेझॉनवरून एक्सबॉक्स कंट्रोलर मागवला होता. परंतु त्यांनी पॅकेट उघडल्यानंतर आतमध्ये जिवंत साप पाहून त्यांना धक्काच बसला. सुदैवाने साप पॅकेजिंग टेपमध्ये अडकला. अन्यथा आमच्या घरातील किंवा अपार्टमेंटमधील इतर लोकांना त्रास होऊ शकला असता. एवढ्या निष्काळजीपणानंतरही अ‍ॅमेझॉन त्यांचे ऐकत नसल्याचा आरोप केला. कस्टमर केअरच्या कर्मचाऱ्यांनीही त्यांना दोन तास फोनवर अडकवून ठेवले. त्यामुळे मध्यरात्रीच्या सुमारास त्यांना नाहक त्रासाचा सामना करावा लागला. ई-कॉमर्स कंपन्यांनी त्यांचे पॅकेजिंग आणि वितरण प्रक्रिया अधिक सुरक्षित आणि विश्वासार्ह बनवण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत, अशी मागणी या घटनेनंतर केली गेली.

## इमारती चोरांच्या ताब्यात!

**स्पे**नसारख्या प्रगत देशातल्या काही इमारतींचं बांधकाम अपूर्ण असून त्या चोरांच्या ताब्यात आहेत, यावर अनेकांचा विश्वास बसणार नाही. पण हे खरं आहे. २००८ मध्ये आलेल्या आर्थिक मंदीचा भारत, अमेरिकेसह अनेक देशांवर परिणाम झाला. बरेच देश या धक्क्यातून सावरले. पण स्पेनवर या मंदीचा परिणाम दिर्घकाळ राहिला. तब्बल ३४ लाख घरं अपूर्ण अवस्थेत आहेत. त्यामुळे कोणी त्यांना हात लावायला तयार नाही. यात वॅलेंसियातल्या हाउसिंग सोसायटीतली घरंही आहेत. या घरांची एकूण किंमत भारतीय चलनात ३.५ लाख कोटी रुपयांच्या आसपास असल्याचं बोललं जातं. आता ही घरं पाडून टाकायचा सरकारचा विचार आहे. पण त्याला प्रचंड खर्च येणार आहे. या प्रकल्पांचा



इथल्या बांधकाम व्यावसायिकांनी त्या काळात दर्जेदार गृहप्रकल्पांच्या बांधकामांना सुरूवात केली होती. पण मंदीमुळे काम थांबलं. यामुळे जवळपास सर्व बिल्डर्सचं दिवाळं निघालं. अपूर्ण इमारती कोणीही खरेदी केल्या नाहीत. इथल्या वॅलेंसिया शहरातल्या अनेक इमारती तशाच पडून आहेत. अंदाजानुसार देशभरातली लिलाव करण्याचीही बँकांची तयारी नाही. इथल्या मालमत्तेच्या किंमती खूप घसरल्याने खरेदीदार मिळण्याची शक्यताही खूप कमी आहे. म्हणूनच घरांवर चोरांनी ताबा मिळवला आहे. चोर घरांमधले नळ, कॉपर वायरिंग तसंच इतर वस्तू काढून बाजारात विकतात. वॅलेसियामध्ये मालमत्तेच्या किंमती ५० टक्क्यांनी घटल्या आहेत.

## आकाशगंगा पाहायची? येथे जा!

मुंबई, दिल्ली किंवा चेन्नईसारख्या महानगरातील वाढत्या प्रदुषणामुळे आकाशातील तारे दिसतच नाहीत. आता मॉन्सून सुरू झाल्याने ढगांमुळे आकाश दिसत नाही; परंतु देशातील एक गाव असे आहे जेथे आपल्याला आकाशगंगा दिसते.

आकाशगंगा पाहण्यासाठी येथे पर्यटक जमतात. वाढत्या प्रदूषणाने तारे दिसत नाहीत. या गावाला जगातील सर्वात उंच गाव म्हटले जाते. आपला भारत इतका विशाल आहे, की येथे एकाच देशात अनेक प्रकारचे हवामान आणि भौगोलिक रचना पाहायला मिळत असते. हिमाचल प्रदेशातील स्पिती जिल्ह्यामध्ये हे गाव आहे. या गावाला जगातील सर्वात उंच गाव म्हटले जाते. या गावाचे नाव कौमिक गाव. येथे आपल्या उघड्या डोळ्यांनी आकाशगंगा पाहायला मिळते. ते पाहण्यासाठी दुर्बिणीची गरज नसते. रात्रीच्या अंधारात तारे असे चमकतात की आपण विश्वास ठेवू शकणार नाही. याचा अनुभव घेण्यासाठी या गावात जायलाच हवे.


कौमिक गाव समुद्रसपाटीपासून सुमारे १५ हजार २७ फूट उंचीवर वसलेले आहे. तिथे मोटर बाइकने सहज जाता येते. यामुळेच या गावात पर्यटकांचा राबता



असतो. या गावात जून महिन्यातील तापमान सात ते नऊ अंश सेल्सियसपर्यंत खाली उतरलेले असते. थंडीत इथली घरेदेखील रिकामी असतात. कारण एवढ्या थंडीत गावात राहाणे शक्य नसते. दरम्यान, गावकरी पायथ्याशी असलेल्या घरांमध्ये राहतात. थंडी गेली की पुन्हा ते आपल्या गावातील मूळ घरात येतात. कौमिक गावाची आशियातील नव्हे, तर जगातील सर्वात उंच

## आपले हात

**हा**त हा माणसाचा अत्यंत महत्त्वाचा अवयव. हात नसतील तर माणूस काहीही करू शकणार नाही. त्यातही उजवा हात म्हणजे माणसाचं सर्वस्व. म्हणूनच आपला हात जगन्नाथ ही म्हण अस्तित्त्वात आली असावी. तर अशा या हातांशी संबंधित गंमतीशीर बाबी आपण जाणून घेऊ या.



आपल्या बोटांत स्नायू नसतात. ज्या स्नायूंमुळे बोटं हलतात ते हाताच्या पंजात असतात. हे स्नायू बोटांशी जोडलेले असतात. १२.६ टक्के पुरूष तर ९.९ टक्के महिला डावखुऱ्या असतात.

खेळाडूंना होणाऱ्या एक चर्तुथांश जखमा हात किंवा मनगटाशी संबंधित असतात. पंजा ओला राहिला तर त्यावरची त्वचा सुरकुतते. यामागचं नेमकं कारण माहीत नसलं तरी नसांमुळे असं होत असल्याचा शास्त्रज्ञांचा अंदाज आहे. अंगठ्यावर एकूण नऊ स्नायू नियंत्रण ठेवतात. या स्नायूंवर हातांशी संबंधित तीन नसांचं नियंत्रण असतं. प्रत्येक हातात छोटी मोठी २९ हाडं असतात. २९ मुख्य सांधे, बोटं हलवणारे ३४ स्नायू, ४८ नसा आणि ३० रक्तवाहिन्या असतात. एक हजार लोकांमध्ये एक जण दोन्ही हातांचा एकसारख्या पद्धतीने वापर करु शकतो. स्पर्शामुळे ऑक्सिटॉसिन हार्मोन्सची निर्मिती होते. या हार्मोन्समुळे आपल्याला बरं वाटतं. हात धरल्यामुळे स्ट्रेस हार्मोन्सचं प्रमाण कमी होतं.

## ट्रॅफिक टाळण्यासाठी हेलिकॉप्टरने प्रवास

**ज**गाची लोकसंख्या वेगाने वाढत आहे. त्याच वेगाने शहरांमधील रहदारीही वाढत आहे. अशा परिस्थितीत कार किंवा बाईकने बाहेर पडल्यास तासनतास ट्रॅफिक जॅममध्ये अडकण्याचा दैनंदिन अनुभव असतो. ऑफिसला जाणाऱ्यांना स्वत:च्या वाहनाने जाणे अधिक कठीण झाले आहे. म्हणूनच बहुतेक लोक मेट्रोमध्ये प्रवास करणे योग्य मानतात. असेच एक प्रकरण अमेरिकेतील न्यूयॉर्क शहरातून समोर आले आहे. तिथे एका महिलेने ट्रॅफिक टाळण्यासाठी अनोखा उपाय योजला आणि हेलिकॉप्टरने आपले कार्यालय गाठले.

अमेरिकेतील न्यू यॉर्कमध्ये राहणारी भारतीय वंशाची महिला खुशी सूरीने तिच्या एक्स अकाउंटवरून एक स्क्रिनशॉट शेअर केला आहे. खुशीला काही कामानिमित्त बाहेर जायचे होते आणि तिला न्यूयॉर्कच्या ट्रॅफिकची चांगलीच कल्पना होती. तिने कॅब बुक करण्यास सुरुवात केली, तेव्हा तिच्याकडे त्यासाठी १३० डॉलरची मागणी करण्यात आली आणि तिला एक तासाची वेळ सांगण्यात आली. हे पाहून खुशीने कॅब राइड रद्द केली आणि



ब्लेड या साईटचा आधार घेतला. ही साईट अमेरिकेत हेलिकॉप्टर कॅब सुविधा प्रदान करते. खुशीने हेलिकॉप्टर राईडचा दर पाहिला, तेव्हा तो कारपेक्षा फक्त तीस डॉलर जास्त होता आणि राईड केवळ पाच मिनिटांत पूर्ण झाली. त्यामुळे खुशीने कॅबऐवजी हेलिकॉप्टरने जाण्याचा निर्णय घेतला.

खुशीने हा अनुभव सोशल मीडियावर शेअर केला आहे. तिच्या पोस्टवर यूजर्सने कमेंट केल्या आहेत. एका यूजरने लिहिले, की १६० डॉलर्स खूप आहेत. भारतातील अनेक लोकांचा हा पगार आहे. दुसऱ्या वापरकर्त्याने लिहिले, की इतके पैसे देण्यापेक्षा मी पायी चालणे पसंत करेन, तर दुसऱ्या यूजरने लिहिले, की दीदी फक्त राईडसाठी १३ हजार देत आहे, मग ती किती कमावते?

## माणसं पिंजऱ्यात, प्राणी स्वातंत्र्यात

**प्रा**णीसंग्रहालयात प्राणी पिंजऱ्यात असतात आणि पर्यटक बाहेरून त्यांना न्याहाळत असतात. पण चीनमधल्या एका प्राणीसंग्रहालयात माणसं पिंजऱ्यात बंदिस्त होऊन फिरतात तर प्राणी मोकळेपणाने बाहेर फिरत असतात. 'लेहे लेदू वाईल्डलाईफ झू' असं या ठिकाणाचं नाव आहे. इथे प्राण्यांना



पूर्ण मोकळीक देण्यात आली आहे. माणसं पिंजरा असणाऱ्या गाडीत बसतात. ही गाडी त्यांना प्राणीसंग्रहालय फिरवून आणते. चीनमधल्या चाँगक्विंग शहरातलं हे स्थान पर्यटकांच्या आकर्षणाचं केंद्र बनलं आहे. २०१५ मध्ये ते सुरू करण्यात आलं. यामुळे पर्यटक प्राण्यांना खूप जवळून बघू शकतात. पर्यटकांनी भरलेला पिंजरा प्राण्यांजवळ नेला जातो. शिकार बघून प्राणी जवळ येतात. मग त्यांना अन्नही देता येतं. हा थरार अनुभवण्याची मजा निराळीच आहे. जंगली श्वापदं पिंजऱ्यावर चढून बसतात. यावेळी पर्यटकही श्वास रोखून धरतात. पण पिंजऱ्याच्या आत ते पूर्णपणे सुरक्षित असतात. इथलं प्रशासन सुरक्षेच्या बाबतीत सर्वतोपरी काळजी घेतं. लोकांना सूचनाही दिल्या जातात. बोटंही बाहेर न काढण्याचं आवाहन केलं जातं. जनावराने पाठलाग सुरू केल्यानंतर काय वाटू शकतं याची जाणीव करून देण्याचा हा एक प्रयत्न असल्याचं इथल्या प्रशासनाचं म्हणणं आहे. पांढरा वाघ, पट्टेदार वाघ, सिंह, अस्वल अशी श्वापदं इथे मुक्तपणे फिरत असतात.

## ...म्हणून ती पोलिसात गेली

**द**ही किंवा कोणताही पदार्थ कोणी खाल्ला म्हणून कोणी थेट पोलिसात तक्रार करायला जात नाही. पण तैवानमधल्या एका मुलीने अवघं १०० रुपयांचं दही चोरीला गेल्याची तक्रार केली. इतकंच नाही तर आरोपीला शोधण्यासाठी पोलिसांनी काही हजार रुपये खर्च केले. त्याचं झालं असं की होस्टेलमध्ये राहणाऱ्या एका तरूणीने फ्रीजमध्ये दही ठेवलं होतं. पण ते कोणी तरी खाऊन टाकलं. तिने काही मुलींकडे चौकशी केली. पण हाती काहीच लागलं नाही. मग तिने थेट तैपई पोलिसात तक्रार केली. सुरूवातीला पोलिसांनाही धक्का बसला. पण नंतर त्यांनी तिची तक्रार नोंदवून घेतली. दह्याच्या पाकिटावरच्या ओलसरपणामुळे त्यावर हाताचे ठसे उमटले नव्हते. त्यामुळे दोषींना पकडताना त्यांना बऱ्याच अडचणी येत होत्या. अशा वेळी तरूणीने पोलिसांना फॉरेन्सिक टीमची मदत घेण्याचा सल्ला दिला. मग या टीमने एका तरूणीसह सहा लोकांची डीएनए चाचणी केली. या चाचणीच्या निकालांवरून पोलिसांनी आरोपीला पकडलं खरं पण या चौकशीसाठी तब्बल ४२ हजार रुपये खर्च




झाले. एका माणसाच्या डीएनए चाचणीसाठी पोलिसांनी तीन हजार तैवानी डॉलर म्हणजे तब्बल ७ हजार रुपये खर्च केले. अर्थात या प्रकरणाबद्दल तैवानी नागरिकांनी नापसंती व्यक्त केली आहे. एवढ्याशा घटनेसाठी करदात्यांचे पैसे फुकट घालवण्याची काहीच गरज नव्हती, असं लोकांचं म्हणणं आहे. चार आण्याची कोंबडी आणि बारा आण्याचा मसाला असाच हा प्रकार म्हटला पाहिजे.

## बर्गर बनवणारा 'क्रिएटर'


**रो**बो ही संकल्पना आता अनोखी राहिलेली नाही. परदेशात सुरक्षारक्षक किंवा कर्मचारी म्हणून रोबोंची नेमणूक करण्यात येत असल्याचं तुम्ही ऐकलं असेल. ते घरकामासह विविध प्रकारची कामं करू शकतात. असाच एक रोबो अमेरिकेतल्या सॅन फॅन्सिस्कोमधल्या रेस्तराँमध्ये काम करतो.'क्रिएटर' असं त्याचं नाव. हा 'क्रिएटर' बर्गर एक ठेऊ शकतो. ही कामं करताना 'क्रिएटर' अजिबात गोंधळत नाही. त्याच्याकडून चूकही होत नाही. याचं कारण म्हणजे प्रोग्रामिंगचं तंत्रज्ञान. या तंत्रज्ञानामुळे तो सगळी कामं वेगात आणि अचूक करू शकतो. यासोबतच ग्राहकांच्या आवडीनुसार तो मसाले घालून बर्गरमधलं पॅटिस कडक किंवा मऊ भाजून देतो. शास्त्रज्ञांनी त्यादृष्टीनेच



बनवतो. तो बर्गर बनवणारा जगातला पहिलाच स्वयंचलित रोबो असल्याचं 'फोर्ब्ज'चं म्हणणं आहे. तो ताजा, लुशलुशीत आणि चविष्ट बर्गर बनवतो. इतकंच नाही तर एका वेळी भरपूर बर्गर तयार करू शकतो. 'क्रिएटर' एकाच आकारात कांदा, टोमॅटो, काकडीच्या चकत्या कापू शकतो. पनीर, चिकनचे समान तुकडे करू शकतो. चिकन किंवा व्हेज पॅटिस भाजू शकतो. बर्गरचा ब्रेड कापून यात हे सगळं साहित्य एकावर 'क्रिएटर'ची रचना केली आहे. हा रोबो एका तासात १२० बर्गर तयार करतो. त्याच्यात थर्मल सेंसरवर चालणारं यंत्र बसवण्यात आलं आहे. क्रिएटरमध्ये तब्बल ३५० सेंसर्स असून २० कॉम्प्युटर्सच्या मदतीने तो काम करतो. त्याने तयार केलेल्या बर्गरना भरपूर मागणी असून ६ डॉलर एवढी एका बर्गरची किंमत आहे. असा हा अनोखा 'क्रिएटर' सोशल मीडियावर बराच लोकप्रिय झाला.

## चित्र-विचित्र शिक्षा

**शि**क्षा म्हणजे नेमकं काय या प्रश्नाचं उत्तर आपल्याला न आवडणारी गोष्ट करावी लागणं हे असू शकतं. शिक्षा म्हटली की आपल्याला तुरूंग दिसतो. पण जगभरात वेगवेगळ्या प्रकारच्या शिक्षा देण्यात येतात. काही शिक्षा इतक्या गमतीशीर आहेत की त्यांच्याबद्दल ऐकल्यानंतर आपण पोट धरून हसू. अमेरिकेतल्या मिसौरीतल्या डेव्हिड बेरीला हरणांची शिकार केल्याप्रकरणी दोषी धरण्यात आलं, तुरूंगात टाकण्यात आलं. पण इथे डिज्नेचं बाम्बी कार्टून बघण्याची शिक्षा त्याला देण्यात



आली. २००३ मध्ये शिकागोतल्या दोन तरूणांना ४५ दिवसांचा तुरूंगवास ठोठावण्यात आला होता. ख्रिसमसच्या पूर्वसंध्येला येशूची मूर्ती चोरल्याचा आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आला होता. या दोघांची गाढवावरून धिंड काढण्यात आली. मूर्खपणाच्या गुन्ह्यासाठी आम्ही माफी मागतो, असं पोस्टर त्यांना लिहावं लागलं. स्पेनमधल्या एका तरूणाने पॉकेटमनी बंद केल्यामुळे आईवडिलांना कोर्टात खेचलं. पण न्यायालयाने उलट या मुलालाच शिक्षा ठोठावली. आईवडिलांच्या घरातून बाहेर पडून स्वत:च्या पायावर उभं राहून दाखवण्याची शिक्षा त्याला देण्यात आली. २००८ मध्ये अँड्रू वेक्टरला ध्वनी प्रदुषणाबद्दल १२० पाउंड भरण्याची शिक्षा देण्यात आली. तो रॅप संगीत ऐकत होता. यासोबत त्याला शास्त्रीय संगीत ऐकायची शिक्षा देण्यात आली.



नावडतं संगीत ऐकताना किती त्रास होतो याची जाणीव करवून देण्याच्या उद्देशाने वेक्टरला ही शिक्षा देण्यात आली होती. तो फक्त १५ मिनिटं ते संगीत ऐकू शकला.

# कचरा संकलन आणि व्यवस्थापनाबाबत तातडीने चौकशी आणि कार्यवाहीची गरज

## माजी नगरसेवक योगीराज गाडे यांची गृहनिर्माण व शहरी व्यवहार मंत्रालयाला पत्र लिहून तक्रार



नगर – अ.नगर शहरातील स्वच्छता आणि कचरा व्यवस्थापनाच्या समस्येबाबत तातडीने चौकशी आणि कार्यवाहीची आवश्यकता असल्याबाबत तक्रार अ.नगरच्या माजी नगरसेवक योगीराज शशिकांत गाडे यांनी गृहनिर्माण व शहरी व्यवहार मंत्रालयाला पत्र लिहून अहमदनगर शहरातील स्वच्छता आणि कचरा व्यवस्थापनाच्या गंभीर स्थितीबाबत तात्काळ चौकशी आणि कार्यवाहीची मागणी केली आहे.



या निवेदनात म्हटले की, आमच्या शहरातील स्वच्छता आणि कचरा व्यवस्थापनाबाबत गंभीर समस्या आहेत. स्वच्छ भारत मिशन अंतर्गत मोठ्या प्रमाणात निधी आणि २०२० मध्ये खरेदी केलेल्या सुमारे ६५ कचरा संकलन वाहनानंतरही, सध्याच्या कचरा संकलनाची अवस्था अत्यंत चिंताजनक आहे. अहमदनगर महानगरपालिका घर ते घर कचरा संकलन करण्यात पूर्णतः अपयशी ठरली आहे. शहरभर कचऱ्याचे ढीग साचले आहेत, ज्यामुळे अत्यंत अस्वच्छ वातावरण तयार झाले आहे. या अपयशाचे मुख्य कारण म्हणजे कार्यरत कचरा वाहनांची अपुरी संख्या. २०२० मध्ये खरेदी केलेल्या सुमारे १५ ते २० वाहन सध्या नादुरुस्त अवस्थेत आहेत आणि महानगरपालिकेच्या जवळ रांगेत उभी आहेत. तसेच, कचरा लँडफिलची स्थिती समाधानकारक नाही. लँडफिल साइटवर कचऱ्याचे व्यवस्थापन आणि प्रक्रिया अत्यंत अपुरी आहे, ज्यामुळे शहरातील स्वच्छता संकट अधिक तीव्र झाले आहे. या परिस्थितीमुळे अहमदनगर शहरातील रहिवाश्यांसाठी गंभीर आरोग्य आणि स्वच्छता समस्या उद्भवल्या आहेत. या तातडीच्या मुद्द्यांच्या अनुषंगाने, मी आपल्या आदरणीय कार्यालयाला स्वच्छ भारत मिशन अंतर्गत प्रदान केलेल्या निधी आणि संसाधनांच्या गैरव्यवस्थापनाबाबत तात्काळ चौकशी करण्याची विनंती करतो. नादुरुस्त अवस्थेत असलेल्या कचरा संकलन वाहनांच्या मागील कारणांची चौकशी करणे आणि अहमदनगर महानगरपालिकेच्या कचरा व्यवस्थापनातील एकूणच अपूर्णतेची चौकशी करणे अत्यंत आवश्यक आहे.

आपला हस्तक्षेप हे सुनिश्चित करण्यासाठी अत्यावश्यक आहे की आमच्या शहरातील स्वच्छता व स्वच्छता लवकरात लवकर पुनर्संचयित करण्यासाठी तात्काळ सुधारात्मक उपाययोजना केल्या जातील.

# मागील दोन महिन्यापासून नळाला पाणी येत नसल्याने महिलांचा संताप

## प्रश्न तातडीने सोडविण्याचे मनपा पाणी पुरवठा विभाग प्रमुखांना निवेदन



पाणी प्रश्न तातडीने सोडविण्याच्या मागणीसाठी काटवन खंडोबा रोड, गाझीनगर येथील महिलांनी पाणी पुरवठा विभागाचे प्रमुख परिमल निकम यांची भेट घेऊन निवेदन दिले.

नगर – मागील दोन महिन्यापासून नळाद्वारे पाणी येत नसल्याने निर्माण झालेला पाणी प्रश्न तातडीने सोडविण्याच्या मागणीसाठी काटवन खंडोबा रोड, गाझीनगर येथील महिलांनी पाणी पुरवठा विभागाचे प्रमुख परिमल निकम यांची भेट घेऊन निवेदन दिले.

माजी नगरसेविका सुवर्णाताई जाधव व उपस्थित महिलांनी पाणी प्रश्नाचा पाढा संबंधित अधिकाऱ्यांपुढे वाचला. परिमल निकम यांनी पाण्याची लाईन चेक करुन सदर प्रश्न तातडीने सोडविण्याचे आश्वासन दिले. यावेळी हसीना शेख, सकीना शेख, तायरा शेख, शाहीन शेख, शमीम इनामदार, कमल दातरंगे, कौसर पठाण, आयशा बागवान, शमा बागवान, मुन्नी शेख, अमिना शेख, कमल इंगळे, शहनाज शेख, नसीम शेख, इर्शाद सय्यद, जबीन बागवान, परविन बागवान आदींसह परिसरातील महिला उपस्थित होत्या.

प्रभाग क्रमांक १५ मधील काटवन खंडोबा रोड, गाझीनगर भागात मागील दोन ते तीन महिन्यापासून पाण्याचा प्रश्न भेडसावत असताना, नळाद्वारे पूर्ण दाबाने पाणी येत नाही व पुढील भागातील नागरिकांच्या नळांना पाणी येत नसल्याने महापालिकेची पाणीपट्टी भरुन देखील पाण्यासाठी वणवण करण्याची वेळ आली आहे.

पाणी येत नसल्याने नागरिकांना टँकरवर विसंबून रहावे लागत आहे. टँकर देखील वेळेवर उपलब्ध होत नसल्याने महिला व लहान मुलांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. सदर परिसरात सर्वसामान्य मध्यमवर्गीय नागरिक राहत असल्याने त्यांना दररोज पिण्यासाठी पाणी विकत घेणे परवडत नाही. या भागातील पाण्याचा प्रश्नाबाबत वारंवार तक्रारी करुन देखील संबंधित पाणीपुरवठा विभागाचे कर्मचारी दखल घेत नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

दोन इंचीच्या लाईनमधून सर्वांना नळ कनेक्शन देण्यात आले आहे. सध्या या भागात मोठ्या प्रमाणात लोकवस्ती वाढली असून, दोन इंचीच्या लाईनमधून एवढ्या मोठ्या लोकांना नळ कनेक्शन देण्यात आलेले आहे. त्यामुळे नागरिकांना पाणी मिळणे अवघड झाले आहे. तसेच मोजक्या ठिकाणीच पाणी सोडण्याचे वॉल असल्याने मुख्य लाईन असलेल्या रस्त्यावरील घरांना तीन–तीन तास पाणी पुरवठा सुरु असतो. मात्र आतील भागातील घरांना अर्धा तास देखील पुरेश्या दाबाने पाणी येत नाही, तर पुढील भागातील नळातून थेंबभर पाणी मिळणे कठिण झाले आहे. या ठिकाणी मोठी पाईपलाईन टाकून किंवा नवीन पाणी सोडण्याच्या वॉलचे नियोजन केल्यास सर्वांना पुरेश्या दाबाने पाणी मिळणे शक्य होणार असल्याचे निवेदनात म्हंटले आहे.

नागरिकांचे पाण्यासाठी मोठ्या प्रमाणात हाल होत असताना सर्वांच्या संतप्त भावना असून, नागरिकांवर आंदोलन करण्याची वेळ आणू नये. तरी महापालिका प्रशासनाने या पाणी प्रश्नाची गंभीर दखल घेऊन तातडीने उपाययोजना करण्याची मागणी महिलांनी केली आहे.

# महिलांच्या गळ्यातील दागिने चोरणारा सराईत गुन्हेगार पकडला

## चोरीतील ३ लाख ५५ हजाराचे सोन्याचे दागिने पोलिसांनी केले हस्तगत





महिलांच्या गळ्यातील दागिने चोरणारा नाशिक येथील सराईत गुन्हेगार पकडल्या नंतर त्याच्या समवेत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

नगर – नगर शहर, संगमनेर व लोणी परिसरात महिलांच्या गळ्यातील सोन्याचे दागिने चोरणार्या नाशिक येथील सराईत गुन्हेगाराला स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी जेरबंद केले. विनोद गंगाराम पवार (वय ४०, रा. सिडको झोपडपट्टी, भगतसिंगनगर, नाशिक) असे त्याचे नाव आहे. त्याच्या ताब्यातून ३ लाख ५५ हजाराचे सोन्याचे दागिने हस्तगत करण्यात आले आहे.

दरम्यान, नगर शहरातील तोफखाना पोलीस ठाण्यातील एक, संगमनेर शहर पोलीस ठाण्यातील दोन तर लोणी पोलीस ठाण्यातील एक असे एकुण चार गुन्हे उघडकीस आले आहेत. कल्पना राजेंद्र गांगुर्डे (रा. रेणावीकरनगर, भिडे चौक, नगर) यांच्या गळ्यातील अडीच तोळ्याचे मंगळसूत्र दुचाकीवरून आलेल्या दोघांनी ओरबडले होते. या प्रकरणी गांगुर्डे यांच्या फिर्यादीवरून तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

पोलीस अधीक्षक राकेश ओला यांच्या आदेशाने गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक हेमंत थोरात, अंमलदार रवींद्र कर्डिले, दत्तात्रय गव्हाणे, सचिन अडबल, गणेश भिंगारदे, देवेंद्र शेलार, संतोष खैरे, अमृत आढाव, फुरकान शेख, मेघराज कोल्हे व चंद्रकांत कुसळकर यांचे पथक या गुन्ह्याचा समांतर तपास करत होते. पथकाने नगर शहर, संगमनेर व लोणी परिसरात झालेल्या सोनसाखळी चोरीच्या घटनास्थळी भेट देऊन सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली असता सराईत गुन्हेगार विनोद पवार (रा. नाशिक) याचे नाव निष्पन्न झाले.


पथक त्याचा शोध घेत असताना सोमवारी (दि.१ ) तारकपूर बस स्थानकाच्या गेटवर तो असल्याची माहिती पोलीस निरीक्षक आहेर यांना मिळाली होती. पथकाने खात्री करून त्याला ताब्यात घेतले. त्याच्याकडे चौकशी केली असता साथीदार किशोर धोत्रे (रा. शांतीनगर, जि. नाशिक) याच्यासोबत जुन महिन्यात संगमनेर, लोणी व नगर शहरातील महिलांचे गळ्यातील मंगळसुत्र चोरी केल्याची कबूली दिली. दरम्यान, किशोर धोत्रे याचा शोध घेतला असता तो मिळून आला नाही.

## चेक बाऊन्सच्या आरोपातून निर्दोष मुक्तता

नगर – उसनवार घेतलेल्या साडेआठ लाख रुपयांच्या परतफेडीसाठी देण्यात आलेल्या धनादेश बाऊन्स झाल्याप्रकरणी मिरणाल बॅनर्जी यांच्यावर नोव्हेंबर २०२२ न्यायालयात दावा दाखल करण्यात आला होता. याप्रकरणी सुनावणी होऊन फिर्यादी यास रक्कम देणे लागत नसल्याचे न्यायालयाने स्पष्ट करुन बॅनर्जी यांची चेक बाऊन्सच्या आरोपातून निर्दोष मुक्तता केली आहे.

आर्थिक अडचणीसाठी उसनवार घेतलेले साडे आठ लाख रुपयेच्या परतफेडीसाठी आरोपी मिरणाल बॅनर्जी यांनी फिर्यादी यांना साडे आठ लाख रुपयाचा चेक दिला होता. सदरचा चेक फिर्यादी यांनी त्यांच्या बँक खात्यात भरला असता तो वटला नाही. चेक बाऊन्स होऊन ४ नोव्हेंबर २०२२ रोजी परत आला. त्यानंतर फिर्यादी यांनी आरोपीला १४ नोव्हेंबर २०२२ रोजी नोटीस पाठवून चेक बाऊन्स झाल्याबाबत कळविले. आरोपीने सदरची नोटीस स्विकारुन त्या नोटीसला उत्तर दिले.याप्रकरणी फिर्यादी यांनी आरोपी बॅनर्जी विरुद्ध अतिरिक मुख्य न्यायदंडाधिकारी मा.ई.मो. नाईकवाडी (कोर्ट नं.७) यांच्या न्यायालयात निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट क्टचे कलम १३८ प्रमाणे फौजदारी खटला दाखल केला होता. सदर प्रकरणाची गुणदोषावर चौकशी करून न्यायालयाने आरोपीच्या वकिलांचा युक्तिवाद ग्राह्य धरून आरोपी हा फिर्यादी यास रक्कम देणे लागत नाही, म्हणून आरोपी बॅनर्जी यांना निर्दोष मुक्ततेचे १ जुलै २०२४ रोजी आदेश दिले. आरोपीच्या वतीन ॲड. हाजी रफिक बेग, ॲड. रियाज बेग, ॲड. आयाज बेग यांनी काम पाहिले.

# पुणतांबा ते कान्हेगाव रेल्वे मार्गाची चाचणी यशस्वी; ताशी १३० कि मी वेगाने धावली रेल्वे





नगर – मनमाड इलेक्ट्रीक डबल लाईन रेल्वे मार्ग प्रकल्पा अंतर्गत पुणतांबा ते कान्हेगाव ८.६६ कि.मी. अंतराची नवव्या टप्प्याची चाचणी मंगळवारी (दि.२ जुलै) यशस्वी झाली. लवकरच नगर ते मनमाड पर्यंतचे हे काम पूर्ण होणार असून, यामुळे नगरचा रेल्वे प्रवास सुपरफास्ट होणार आहे.

या पूर्ण मार्गात इलेक्ट्रीक इंजीनचा वापर होत आहे. गेल्या तीन वर्षापासुन नगर ते मनमाड द्रुतगती (डबललाईन) रेल्वे मार्गाचे काम सुरू आहे. या पुर्वी कोपरगाव ते येवला व येवला ते अंकाई, अंकाई ते अंकाई किल्ला, अंकाई किल्ला ते मनमाड, कोपरगाव ते कान्हेगाव, बेलापूर ते पुणतांबा, बेलापूर ते पढेगाव, निंबळक ते वांबोरी या मार्गाची यशस्वी चाचणी घेण्यात आली. आता नुकतेच पुणतांबा ते कान्हेगाव ८.६६ कि.मी. डबल लाईन रेल्वे मार्गाची चाचणी घेण्यात आली. आता एकूण ११५ कि.मी अंतराची चाचणी पूर्ण घेतल्याची माहिती उप मुख्य अभियंता (बांधकाम) दीपक कुमार यांनी दिली.

मनमाड ते दौंड रेल्वे मार्गात नगरच्या रेल्वे स्थानकाचा महत्त्व पूर्ण टप्पा येतो. मात्र हा मार्ग सिंगल लाईन असल्यामुळे रेल्वेगाडीचा वेग कमी होता. तसेच सिंगल लाईनमुळे अनेकदा रेल्वेगाड्यांना थांबा घ्यावा लागत होता. तासन्तास रेल्वे गाडी एकाच जाग्यावर थांबून ठेवावी लागत होती. मात्र आता हा पूर्ण मार्ग इलेक्ट्रीक इंजीनचा वापर करून डबल लाईन करण्यात येत असल्यामुळे विनाकारण रेल्वेगाड्यांचा थांबा आता बंद होणार आहे. पुणतांबा ते कान्हेगाव या द्रुतगती रेल्वे मार्गावर मध्ये गोदावरी नदी वरील लांबी २८८ मीटर व उंची १८ मीटर लांबीचा असलेला सर्वात मोठा पुल बांधण्यात आला आहे. हा रेल्वे पुल बनवण्यासाठी दीड वर्षाचा कालावधी लागला असून, नगर ते मनमाड रेल्वे द्रुतगती मार्गामधील सर्वात मोठ्या लांबीचा व उंचीचा पूल असून या पुलामुळे नगर–मनमाड रेल्वे गाड्या धावण्यासाठी बळकटी मिळाली आहे.

तसेच या कामामुळे रेल्वे ताशी १३० प्रति किमी वेगाने धावणार असल्याने रेल्वेगाडी धावण्याचा वेगही सुपरफास्ट होणार आहे. तीन वर्षापासून हे काम सुरू आहे. पहिल्या टप्प्यात नगर ते मनमाड व दुसऱ्या टप्प्यात नगर ते दौंड पर्यंत काम पूर्ण होणार आहे. मंगळवारी झालेल्या चाचणीत या द्रुतगती मार्गाचा नेमका वेग काढण्यात आला. यावेळी ताशी १३० कि.मी. वेगाने रेल्वे धावली. नगर ते मनमाड पर्यंतचा टप्पा पुर्ण होण्यास अजून एक वर्ष लागतील असा अंदाज आहे. या अधिकाऱ्यांच्या उपस्थीतीत पुणतांबा ते कान्हेगाव द्रुतगती लोहमार्गाची चाचणी घेण्यात आली.

रेल्वे सुरक्षा आयुक्त मनोज अरोरा, मुख्य प्राशकीय अधिकारी ए.के. पांडे, मुख्य अभियंता राजकुमार वानखेडे, उप मुख्य अभियंता दीपक कुमार, कार्यकारी अभियंता डी.पी. पटेल, कार्यकारी अभियंता संदीप सिन्हा, सहाय्यक कार्यकारी अभियंता आर. जे. गायकवाड, सिनियर सेक्शन इंजिनिअर प्रगती पटेल, सेक्शन इजिनिअर धर्मेंद्र कुमार, सुद्धाशु कुमार, एक्झिकेटीव्ह, इंजिनिअर व रेल्वेचे अधिकारी उपस्थित होते.

मनमाड ते नगर डबल लाईन (द्रुतगती) रेल्वे मार्गाच्या नव्या टप्प्याची चाचणी मंगळवारी घेण्यात आली. यात रेल्वेगाडीचा नेमका वेग काढण्यात आला आहे. यामध्ये ताशी १३० कि.मी. वेग नोंदवला गेला आहे. या महत्त्वकांक्षी कामामुळे नगरला फायदा होणार असून, नगरचा रेल्वे प्रवास सुपरफास्ट होईल, असे दीपक कुमार (उप मुख्य अभियंता (बांधकाम) अहमदनगर) यांनी म्हटले आहे.





भारतीय जनता युवा मोर्चाने नगरमधील चितळेरोड येथील काँग्रेसच्या कार्यालयावर राहुल गांधी यांचा निषेध करून कार्यलयाच्या शटरवर निषेधाचा फलक लावला. यावेळी शहर जिल्हाध्यक्ष मयूर बोचुघोळ, बंटी ढापसे, सचिन पावले, सुजय मोहिते, अजित कोतकर, आदेश गायकवाड, सुरेश लालबागे आदी.

# हिंदू मुद्द्यावरून काँग्रेस कार्यालयावर भाजपा युवा मोर्चाने लावला निषेध फलक

नगर – सत्ताधारी पक्षाचे नेते हिंदू नाहीत, कारण ते २४ तास हिंसा व द्वेष पसरवत असतात, असा घणाघात लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केला. यावर राहुल गांधी हे संपूर्ण हिंदू समाजाला हिंसाचारी म्हणत असल्याचा आक्षेप सत्ताधाऱ्यांनी घेतला. मात्र, पंतप्रधान नरेंद्र मोदी, भाजप आणि आरएसएस म्हणजे पूर्ण हिंदू समाज नाही, असा पलटवार राहुल गांधी यांनी केला.

विरोधी पक्षनेता म्हणून पहिल्यांदा बोलताना राहुल गांधी यांनी मोदी सरकारवर टीका केली. भाजपचे लोक २४ तास हिंसाचाराची भाषा बोलत असतात; पण हिंदू कधीही हिंसाचार, द्वेष आणि भीती पसरवत नसल्याचे राहुल गांधी म्हणाले. हिंसाचाराच्या आरोपावरून पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी लागलीच आक्षेप घेत काँग्रेस नेत्याने संपूर्ण हिंदू समाजाला हिंसक म्हटल्याचा आरोप केला. याचे पडसाद आज नगरमध्ये उमटले

नगरमधील चितळेरोड येथील काँग्रेसच्या कार्यालयावर भारतीय जनता युवा मोर्चा शहर जिल्हाध्यक्ष मयूर बोचुघोळ, बंटी ढापसे, सचिन पावले, सुजय मोहिते, अजित कोतकर, आदेश गायकवाड, सुरेश लालबागे आदी कार्यकर्त्यांनी राहुल गांधी यांचा निषेद करून कार्यलयाच्या शटरवर निषेधाचा फलक लावला, या मुद्यावरून आता वाद वाढायला सुरुवात झाली आहे.

# ‘माझी लाडकी बहीण योजने’साठी पिवळे, केसरी कुपनधारकांना ‘उत्पन्न दाखल्या’ची गरज नाही



नगर – राज्य सरकारच्या वतीने महिलांना आर्थिक मदत व्हावी यासाठी लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून प्रत्येक महिलेला दीड हजार रुपये प्रति महिना मिळणार आहे. यासाठी ऑनलाइन फॉर्म भरण्यासाठी लागणारे कागदपत्रासाठी महिला मोठ्या संख्येने तलाठी कार्यालय येथे गर्दी करत आहे. महिलांना अधिक–अधिक सोयीच्या सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी राज्य सरकारने आज नवीन जी.आर काढला असून पिवळे आणि केसरी कुपनधारकांना उत्पन्न दाखल्याची गरज नाही, त्यांनी फक्त पहिल्या आणि शेवटच्या पानाची झेरॉक्स अर्जाद्वारे जोडावी तसेच रहिवासी दाखल्यासाठी मतदार ओळखपत्र, जन्म दाखला, शाळा सोडलेला दाखला आणि पंधरा वर्षांपूर्वीचे कुपन या चार पैकी एक चालणार आहे. लाडकी बहीण योजनेची मुदत १५ जुलै ऐवजी दोन महिन्याने वाढवली असून ३१ ऑगस्ट पर्यंत ऑनलाइन अर्ज भरता येणार आहे. तरी महिलांनी तलाठी कार्यालयावर गर्दी न करता आपल्या जवळील असलेले कागदपत्र घेऊन आ. संग्राम जगताप यांच्या कार्यालयावर जावे व ऑनलाईन अर्ज भरून घ्यावा, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर यांनी केले.

## श्रीकांत गुगळे हायस्कूलचे २ विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेच्या गुणवत्ता यादीत

नगर– महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद २०२४, पुणे यांच्यामार्फत घेण्यात आलेल्या आठवी शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून त्यामध्ये विद्यालयातील दोन विद्यार्थी गुणवत्ता यादीत चमकले आहेत.

या परीक्षेस आठ विद्यार्थी पात्र झाले असून यामध्ये दोन विद्यार्थी शहरी विभाग, जिल्हास्तरीय गुणवत्ता शिष्यवृत्तीस पात्र झाले आहेत. कु. अनुष्का सुभाष दरेकर, कु. कांचन नीलेश नन्नवरे उत्तीर्ण झाले आहेत. या विद्यार्थ्यांना गावडे कांचन, भापकर सुनील, सावळे विजयकुमार, सूर्यवंशी उज्वला, पवार सुभाष, सुरसे प्रशांत, वरखडे आशा, कसबे दत्तात्रय या सर्व शिक्षकांनी मार्गदर्शन केले होते

या परीक्षेत सहभागी झालेले विद्यार्थी व मार्गदर्शन करणार्या सर्व शिक्षकांचे संस्थेचे चेअरमन दिलीप गुंदेचा, व्हा. चेअरमन दशरथ खोसे, सेक्रेटरी र. धों. कासवा, सहसेक्रेटरी राजेश झालानी, खजिनदार ॲड विजय मुनोत, विश्वस्त रमेश फिरोदिया, आर. एम. गुंदेचा, दिपक आनेचा, रश्मी येवलेकर, बन्सी नन्नवरे, मनसुखलाल पिपाडा, अभय गांधी, रमेश मुनोत, शिवनारायण वर्मा, राजेंद्र चोपडा, सचिन डागा, सुनिल गुगळे, विद्यालयाच्या प्राचार्या कांचन गावडे, प्रशालेच्या मुख्याध्यापिका योगिता गांधी, विनोदकुमार कटारिया व पालकांनी अभिनंदन केले आहे.



आ.संग्राम जगताप यांच्या सक्कर चौक पंडित हॉस्पिटल समोरील कार्यालयामध्ये माझी लाडकी बहीण योजनेचे कागदपत्र घेण्यात सुरूवात केली आहे. याप्रसंगी महिला–भगिनींना योजनेविषयी माहिती देताना कार्यकर्ते. (छाया – लहू दळवी)

## लाडकी बहीण योजनेचे कागदपत्र आ.संग्राम जगताप यांच्या कार्यालयामध्ये स्वीकारून मोफत ऑनलाइन भरण्यास सुरुवात

नगर – राज्यात महायुतीचे सरकार असून पावसाळी अधिवेशनमध्ये उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी लाडकी बहीण या योजनेची घोषणा केली असून महिलांना कागदपत्र जमा करण्यासाठी सोयीचे व्हावे यासाठी आ.संग्राम जगताप यांनी पुढाकार घेवून सक्कर चौक पंडित हॉस्पिटल समोरील कार्यालयामध्ये सुरू केली आहे. या ठिकाणी लाडकी बहीण योजनेचे महिलांनी कागदपत्रासह उपस्थित राहून आपले फॉर्म भरून घ्यावेत. महिलांना अधिक–अधिक सोयीच्या सुविधा उपलब्ध हव्यात यासाठी आ. संग्राम जगताप यांनी आपल्या कार्यालयामध्ये ऑनलाइन फॉर्म भरण्याची सुविधा उपलब्ध करून दिले असून नगर शहरातील महिलांनी लाडकी बहिण योजनेचा लाभ घ्यावा, अशी माहिती प्रा.माणिकराव विधाते व वैभव ढाकणे यांनी दिली.

